cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६२ | मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# खरीप पेरणी ९५ टक्क्यांवर; अपुऱ्या पावसामुळे आठ लाख हेक्टरची घट

## मराठवाड्यात पिके पाण्याअभावी करपण्याची भीती; कोकणात सर्वाधिक पिछाडी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात खरीप हंगाम २०२६–२७ मधील पेरणी ३१ ऑगस्टअखेर १ कोटी ३६ लाख ५६ हजार हेक्टरवर पोहोचली आहे. गेल्या पाच वर्षांच्या सरासरी खरीप क्षेत्राच्या तुलनेत यंदा ९५ टक्के पेरणी झाली आहे. मात्र, अपुरा पाऊस आणि पावसातील दीर्घ खंड यामुळे सरासरीच्या तुलनेत सुमारे आठ लाख हेक्टर पेरणी क्षेत्र घटले आहे. विशेषतः मराठवाड्यासह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पेरणीचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिले आहे.**



कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, २०१९–२० ते २०२३–२४ या पाच वर्षांत राज्यातील खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र १ कोटी ४४ लाख ३६ हजार हेक्टर होते. यंदा ३१ ऑगस्टपर्यंत १ कोटी ३६ लाख ५६ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. मागील वर्षी २९ ऑगस्टपर्यंत १ कोटी ४२ लाख ७५ हजार हेक्टरवर पेरणी झाली होती. त्यामुळे यंदा मागील वर्षाच्या तुलनेतही पेरणीचे क्षेत्र कमी आहे. यंदा जून महिन्यात पावसाने मोठी ओढ दिली. त्यानंतर जुलैच्या सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने पेरणीला वेग आला. मात्र, ऑगस्ट महिन्यात बहुतांश भागात पाऊस कमी झाल्याने पेरणीची टक्केवारी फारशी वाढू शकली नाही. विशेषतः मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याने आधीच पेरलेल्या पिकांवरही संकट ओढवले आहे. आठवडाभरात पाऊस न झाल्यास पिके जळून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. पुणे विभागाने पेरणीत आघाडी घेतली असून, विभागात १२ लाख ६६ हजार ८३६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. हे प्रमाण सरासरीच्या १०१ टक्के आहे. सोलापूरमध्ये १०४ टक्के, तर अहिल्यानगरमध्ये ९९ टक्के पेरणी झाली आहे. नाशिक विभागात १९ लाख ८५ हजार ३५२ हेक्टरवर पेरणी झाली असून, सरासरीच्या ९८ टक्के क्षेत्राची पूर्तता झाली आहे. नाशिक जिल्ह्यात १०१ टक्के, धुळे ९८, जळगाव ९७ आणि नंदुरबारमध्ये ९० टक्के पेरणी झाली आहे. अमरावती विभागात २९ लाख ८३ हजार ६०१ हेक्टरवर पेरणी झाली असून, हे प्रमाण सरासरीच्या ९४ टक्के आहे. यवतमाळ आणि वाशिममध्ये प्रत्येकी ९३ टक्के, तर अमरावती जिल्ह्यात ९४ टक्के पेरणी झाली आहे. नागपूर विभागातही सरासरीच्या ९४ टक्के पेरणी झाली आहे. मात्र, गोंदिया जिल्ह्याने सरासरी ओलांडत ११३ टक्के पेरणी केली आहे. ▶▶ पान २ वर

# उपोषण सोडणार नाही, मुंबईत जाणारच–मनोज जरांगे पाटील



जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटीतील बेमुदत उपोषणाचा सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) तिसरा दिवस होता. यावेळी आम्ही सरकारपुढे ठेवलेल्या मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सोडणार नाही, मुंबईत जाणारच, अशी ठाम भूमिका जरांगे यांनी घेतली आहे. त्यांचे २९ ऑगस्टपासून उपोषण सुरु आहे.

५८ लाख नोंदीच्या आधारावर सर्वांना कुणबी प्रमाणपत्र मिळावीत तसेच जात पडताळणी दरम्यान नाकारलेली प्रमाणपत्रे द्यावीत, या प्रमुख मागण्यांसाठी त्यांचे पुन्हा एकदा उपोषण सुरु आहे. त्यासाठी त्यांनी राज्य सरकारला १२ सप्टेंबरपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. आम्ही मुंबईला जाण्याची तयारी करत आहोत. सरकारकडून कोणीही संपर्क साधलेला नाही. आजपासून दोन– चार दिवस अगोदरच १२ सप्टेंबरपर्यंत मुंबईत जावे. पोलिसांना कोणताही त्रास द्यायचा नाही. मराठा मुंबईत आल्याचे कुणाला समजायला नको. फक्त आझाद मैदानावर जाऊ नका. पोलिसांनी ठाण्यात नेलं तर घाबरु नका, असे आवाहन त्यांनी मराठा आंदोलकांना केले आहे. आता मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही. ▶▶ पान २ वर

# राज्यातील दोन कोटी मतदारांना वगळलं



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील मतदारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६' अंतर्गत राज्याची नवी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, या यादीतून राज्यातील तब्बल २ कोटींपेक्षा जास्त मतदारांची नावे वगळण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

सखोल पुनरीक्षणाची ही प्रक्रिया राबवण्यापूर्वी राज्यात एकूण ९,७८,५४,०४९ नोंदणीकृत मतदार होते. परंतु, नव्याने प्रसिद्ध झालेल्या मसुद्यात ७,७१,६५,५६२ (७८.८६%) मतदारांचाच समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच गणना प्रपत्र न मिळाल्यामुळे, गैरहजर असणे, स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार ▶▶ पान २ वर

### मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण

या पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान मतदान केंद्रांची पुनर्रचना आणि सुसूत्रीकरणही करण्यात आले आहे. आधी राज्यात १,००,२५३ केंद्रे होती, त्यातील ४३१ केंद्रे कमी करून व ३९४ नवीन केंद्रे जोडून आता एकूण १,००,२१६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.


### १,४०३ केंद्रांचे स्थळ बदलले

मतदारांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १,४०३ मतदान केंद्रांचे स्थळ बदलण्यात आले असून, त्यांना तात्पुरत्या रचनेवरून पक्क्या आणि सुरक्षित इमारतींमध्ये हलवण्यात आले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदाराने आपले नाव आणि मतदान केंद्र तात्काळ तपासून घेणे गरजेचे आहे.

# इथेनॉल याचिकेत हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

## याचिका फेटाळली, उच्च न्यायालयात दाद मागण्याची मुभा

दिल्ली । वृत्तसंस्था




पेट्रोल पंपांवर इंधन भरताना त्यातील इथॅनॉलचे प्रमाण दर्शवणारे लेबल लावणे आणि बिलावर त्याची माहिती देण्यात यावी, या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकर३णात हस्तक्षेप करण्यास निकार दिला आहे. त्यांनी याचिकाकर्त्यांना सबंधित उच्च न्यायालयात दाद मागण्याची मुभा दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयात झालेल्या युक्तीवादात याचिकाकर्ते ॲड एन.के. गोस्वामी यांनी नागिराकांना ते नक्की काय खरेदी करत आहेत हे जाणून घेण्याचा अधिकार असल्याचे सांगितले होते. याचिकाकर्त्यांला भारत सरकारने त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यावे अशी अपेक्षा आहे. असे म्हणत ॲटर्नी जनरल यांनी या याचिकेला विरोध केला होता. दरम्यान, याचिकाकर्ते गोस्वामी यांनी ही मागणी त्यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी नाहीतर देशाच्या नागरिकांच्या अधिकारांबाबत आहे असे सांगितले. ते म्हणाले की, तुम्ही मला नाही तर देशातील नागरिकांना ▶▶ पान २ वर

# राज्यातील पाच हजार सहा.प्राध्यापकांच्या भरतीस मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ५,०१२ सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीस राज्य सरकारने सोमवारी मंजुरी दिली आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील ऑक्टोबर २०२५ पर्यंतची विद्यार्थी संख्या आणि कामाचा भार यांच्या आधारे या पदांना मंजुरी देण्यात ▶▶ पान २ वर

# मराठी पत्रकार परिषदेची सूत्रे शिवराज काटकर यांच्या हाती

## सांगलीत झाला मराठी पत्रकार परिषदेचा महामेळावा आणि कार्यशाळा




सांगली । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा दिमाखदार सोहळा रविवारी सांगली येथे पार पडला. यावेळी झालेल्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीमध्ये अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे शिवराज काटकर यांच्या हत्ती देण्यात आली. मिलिंद आष्टीवकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांनी आपल्या पदाची सूत्रे शिवराज काटकर यांच्या हाती दिली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त ▶▶ पान २ वर


# सिंधू जल करारासंदर्भात हेगमधील लवादाचा निकाल भारताने फेटाळला

## तुम्हाला अधिकारच नसल्याचा केला दावा

दिल्ली । वृत्तसंस्था

**जागतिक बँकेने स्थापन केलेल्या लवाद न्यायालयाने सिंधू जल कराराबाबत दिलेला निकाल भारताने सोमवारी (दि. ३१) फेटाळून लावला. ही संस्था ''बेकायदेशीरपणे स्थापन'' झाल्याचे सांगत, पाणीवाटप करार स्थगित ठेवण्याचा भारताचा निर्णय ''कायम राहील'', असे स्पष्ट करण्यात आले आहे.**

सिंधू जल करार अद्याप लागू असून भारताने जम्मू–काश्मीरमधील जलविद्युत प्रकल्पाचे काम मर्यादित ठेवावे, असा निकाल लवादाने दिला होता. हा करार स्थगित ठेवण्यासाठी नवी दिल्लीने दिलेले कारण कराराचे ''निलंबन किंवा समाप्तीचे समर्थन करत नाही'', असा युक्तिवाद करत लवादाने ▶▶ पान २ वर



### काय आहे सिंधू जल करार?

१९ सप्टेंबर १९६० रोजी कराचीमध्ये भारत आणि पाकिस्तान यांनी जागतिक बँकेच्या मध्यस्थीने सिंधू जल करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. हा करार दोन्ही देशांमधील सिंधू नदी प्रणालीच्या पाणीवाटपाचे नियमन करतो. या करारानुसार रावी, बियास आणि सतलज या पूर्व नद्यांचे पाणी प्रामुख्याने भारताला वाटून देण्यात आले, तर सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिम नद्यांचे पाणी मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानला देण्यात आले. यासोबतच काही विशिष्ट अटींवर दोन्ही देशांना पाण्याचे मर्यादित अधिकारही देण्यात आले.

### अधिकारक्षेत्रावर भाष्य करण्याचा लवादाला अधिकार नाही

पायाभूत सुविधा प्रकल्पांसहित देशाच्या सार्वभौम अधिकारक्षेत्रात येणाऱ्या निर्णयांवर भाष्य करण्याचा लवादाला कोणताही अधिकार नसल्याचे भारताने ठणकावून सांगितले. ''भारताच्या सार्वभौम निर्णयांवर भाष्य करण्याचे कोणतेही अधिकारक्षेत्र या कथित लवादाला नाही,'' असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.त्यांच्या आजच्या किंवा भविष्यातील कोणत्याही निर्णयाचा भारताच्या सुरु असलेल्या प्रकल्पांवरील कार्यवाहीवर कोणताही परिणाम होणार नाही.'' या लवादाची निर्मितीच सिंधू जल कराराचे गंभीर उल्लंघन असल्याचे सरकारने पुन्हा एकदा अधोरेखित केले.

# सीजेपीच्या मोर्चावर बंदी घालण्यास नकार



दिल्ली । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी कॉकरोच जनता पार्टीच्या ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत नियोजित असलेल्या निषेध मोर्चावर बंदी घालणारा कोणताही आदेश देण्यास नकार दिला. आयोजक आणि प्रशासन या दोघांनीही शांततापूर्ण मार्गाने आणि कायद्यानुसार वागावे, अशी अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दिल्ली पोलिसांचे निवृत्त अधिकारी राजेंद्र सिंह यांनी दाखल केली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील आणि न्या. जॉयमाल्य बागची व न्या.व्ही. मोहना यांचा समावेश ▶▶ पान २ वर

# थोडक्यात...

## नेपाळच्या पूर दुर्घटनेतील मृतांचा आकडा ९०३ वर

काठमांडू : राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, सोमवारी मृतांचा आकडा ९०३ च्या पार गेला, तर ४२,०० हून अधिक लोक अद्याप बेपत्ता आहेत. नेपाळ सैन्य, नेपाळ पोलीस आणि सशस्त्र पोलीस दलातील मोठ्या संख्येने जवान तैनात करण्यात आले आहेत, परंतु आधुनिक बचाव साधनांच्या अभावामुळे धोकादायक भूभागातील बचावकार्य अधिक कठीण होत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पूरानंतर बचाव आणि मदतकार्य करणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना विशेष उपकरणे, बॉडी बॅग, दोरखंड आणि हेलिकॉप्टरच्या कमतरतेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. २६ ऑगस्ट रोजी नेपाळ–तिबेट सीमेजवळ बर्फ आणि खडक कोसळल्याने किंवा हिमस्खलनामुळे हा पूर आला असावा, असे मानले जाते. या पुरामुळे भोटेकोशी नदीच्या पात्रात हाहाकार माजला, घरे, रस्ते आणि पूल उद्ध्वस्त झाले आणि जलविद्युत प्रकल्पांचेही नुकसान झाले.

## 'आएनएस निपुण' नौदलाच्या ताफ्यात दाखल

मुंबईः भारतीय नौदलाची समुद्रातील ताकद आणखी वाढली आहे. मुंबईतील नौदल डॉकयार्डमध्ये स्वदेशी बनावटीचे 'निपुण' डाइव्हिंग सपोर्ट व्हेसल भारतीय नौदलाच्या ताफ्यात अधिकृतपणे दाखल करण्यात आले. हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेडने हे जहाज स्वदेशी तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केले आहे. नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्ण स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात आएनएस निपुणचे नौदलात कमिशनिंग करण्यात आले. या जहाजामुळे पश्चिम नौदल कमांडला खोल समुद्रातील बचाव आणि डाइव्हिंग मोहिमांसाठी अत्याधुनिक सुविधा मिळणार आहेत. सुमारे ८,५०० टन वजनाचे निपुण हे जहाज ७५ टक्के स्वदेशी सामग्रीपासून तयार करण्यात आले आहे. हे जहाज समुद्रात ३०० मीटर खोलीपर्यंत सॅचुरेशन डाइव्हिंग करू शकते. तसेच ७५ मीटरपर्यंत साइड–स्टेज डाइव्हिंग मोहिमाही राबवता येतात. समुद्रात एखादी पाणबुडी अडचणीत सापडल्यास तिच्यातील नौसैनिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठीही निपुण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

## फडणवीस यांच्याकडून जरांगेंचा विश्वासघात

मुंबईः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रत्येकवेळी वेगवेगळ्या नेत्यांना आणि मंत्र्यांना पुढे करून ते शब्द द्यायला लावतात आणि नंतर तो शब्द पूर्ण करत नाहीत. फडणवीस हे मराठाद्वष्टे आहेत, ते मराठा समाजाला आरक्षण कधीही देणार नाहीत, अशी टीका ठाकरेसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी केली आहे. जाधव यांनी टीका केली की, महायुती सरकारला मराठ्यांना आरक्षण द्यायचे नाही ही वस्तुस्थिती आहे. सरकारमधील कुठल्याच नेत्यावर आता जरांगे यांचा विश्वास राहिला नाही. मनोज जरांगे यांच्या उपोषणाला महायुती सरकारच जबाबदार आहे. मुख्यमंत्री हे मराठा द्वोष्टे आहेत. प्रत्येक वेळी नवीन जीआर काढून जरांगे यांचे उपोषण सोडवायचे आणि त्यांचा विश्वासघात करायचा, या सगळ्या गोष्टीमुळे जरांगे आता उद्विग्न झाले आहेत. यावेळी मी जरांगे यांची भेट घेणार आहे. देवेंद्र फडणवीस यांची सध्या सगळ्या क्षेत्रात दादागिरी सुरु आहे. हम करे सो कायदा असा प्रकार त्यांनी राज्यात सुरु केला आहे. अशी टीका जाधव यांनी केली. मराठी सक्तीच्या निर्णयावरही जाधव यांनी फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २६.०० क्विंटल | २,५१० | २,८६० | २,६७१ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | २,४०१ | ४,२५५ | ३,३६६ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर :०.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६४.५० क्विंटल | २,४४० | ३,१६१ | २,८३१ |
| मुग: ६.०० क्विंटल | ८,९०० | ९,२२५ | ९,०६२ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,९०४ | ६,००० | ५,४३५ |

cmyk

## अग्रलेख

# आदिवासींच्या नावाने राजकारण, वस्तीगृहांच्या दारात खासगीकरण!

## भाजप-आरएसएसच्या 'समरसते'चा खरा चेहरा कोणता?

आदिवासी समाजाच्या नावाने मेळावे घ्यायचे, आदिवासी महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथींना पुष्पहार अर्पण करायचे, 'जनजातीय गौरव'च्या घोषणा द्यायच्या आणि दुसऱ्या बाजूला आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उभी केलेली सरकारी व्यवस्था हळूहळू खासगी हातांकडे सोपवायचीहा विरोधाभास आता महाराष्ट्राने गंभीरपणे तपासण्याची वेळ आली आहे. राज्यातील ४१० शासकीय आदिवासी वस्तीगृहांमध्ये विविध उपक्रम राबविण्याच्या नावाखाली खासगी संस्थेला प्रवेश देण्याचा निर्णय त्यामुळेच केवळ प्रशासनिक बाब राहत नाही. तो सरकारच्या आदिवासी धोरणाच्या दिशेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा निर्णय ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने याचे उत्तर द्यायलाच हवे.

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहाशी जोडण्याची भाषा करतात. 'वनवासी', 'जनजातीय गौरव', 'समरसता' अशा विविध संकल्पनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाशी जवळीक साधण्याचा राजकीय प्रयत्न केला जातो. परंतु खरी कसोटी घोषणांची नसते; सत्तेच्या निर्णयांमध्ये आदिवासींच्या हक्कांना किती स्थान दिले जाते, याची असते. आणि इथेच प्रश्न उभा राहतो. आदिवासी विद्यार्थ्यांची सरकारी वस्तीगृहे ही सरकारी जबाबदारी आहेत. त्यांच्या निवासाची, सुरक्षेची, भोजनाची, शिक्षणाच्या वातावरणाची आणि सर्वांगीण विकासाची जबाबदारी राज्याची आहे. मग ही जबाबदारी टप्प्याटप्प्याने खासगी संस्थांकडे का ढकलली जात आहे? आज उपक्रमांच्या नावाखाली खासगी संस्थेला प्रवेश; उद्या व्यवस्थापन; परवा आणखी एखादी सरकारी जबाबदारी खासगीकरणाची ही दारे नेमकी कुठे जाऊन उघडणार आहेत? सरकारने याचे उत्तर द्यावे. विशेषतः ज्या संस्थेला वस्तीगृहांमध्ये काम करण्याची संधी दिली जात आहे, तिची निवड कोणत्या प्रक्रियेतून झाली? इतर संस्थांना समान संधी देण्यात आली का? निविदा काढली होती का? तज्ज्ञ समिती होती का? करारातील अटी काय आहेत? खासगी संस्थेला विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे किती अधिकार आहेत? कार्यक्रमांचे विषय कोण ठरवणार? हे प्रश्न विचारले की सरकारला जर अस्वस्थ वाटत असेल, तर अस्वस्थ व्हायलाच हवे. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही; उलट प्रश्न न विचारणे हा समाजासाठी अधिक धोकादायक प्रकार आहे.

'व्यक्तिमत्त्व विकास' या नावाखाली विद्यार्थ्यांमध्ये कोणते विचार रुजवले जाणार, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना संविधान, विज्ञान, विवेक, समानता, सामाजिक न्याय आणि लोकशाहीची मूल्ये शिकवली पाहिजेत. त्यांना सक्षम नागरिक बनवणे हा उद्देश असला पाहिजे. परंतु सरकारी वस्तीगृहांना कोणत्याही राजकीय किंवा वैचारिक प्रयोगाचे मैदान बनवले जाणार नाही, याची हमी सरकारने द्यायलाच हवी. भाजप-आरएसएसच्या राजकारणावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याचे कारण याच ठिकाणी आहे. आदिवासी समाज हा मतपेटी आहे की स्वतंत्र अस्मिता असलेला नागरिकसमूह? आदिवासींच्या संस्कृतीचा सन्मान करायचा असेल तर त्यांच्या जमिनी, शिक्षण, रोजगार, आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक अधिकारांवरही तितक्याच ताकदीने बोलावे लागेल. फक्त आदिवासींच्या नावाने राजकीय कार्यक्रम घेणे आणि प्रत्यक्षात सरकारी संस्थांची जबाबदारी कमी करणे, हा विकासाचा पर्याय असू शकत नाही. फडणवीस सरकारसमोर आज खरी कसोटी आहे. सरकार आदिवासी विकास विभागाला सक्षम करणार की खासगी संस्थांच्या मदतीवर अवलंबून ठेवणार? रिक्त पदे भरणार की बाह्य संस्थांना जबाबदाऱ्या देणार? वस्तीगृहांच्या पायाभूत सुविधा सुधारणार की कार्यक्रमांच्या माध्यमातून विकासाचा देखावा उभा करणार? सरकारी वस्तीगृहांमध्ये खानावळ, सुरक्षा आणि इतर व्यवस्थांबाबत आधीच प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार भोजन, सुरक्षित परिसर, स्वच्छ निवास, अभ्यासासाठी सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचारी मिळत नसतील तर सरकारने आधी स्वतःच्या व्यवस्थेचा आरसा पाहावा. सरकारच्या अपयशावर खासगीकरणाचा रंग फासला म्हणून अपयश विकासात बदलत नाही. आणखी एक मूलभूत प्रश्न आहे, आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत निर्णय घेताना त्यांचा आवाज कुठे आहे? त्यांच्या संघटना, पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी व्यापक चर्चा झाली का? की मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांच्या निर्णयाने हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित धोरण ठरवले जाणार?

भाजप-आरएसएसला आदिवासी समाज खरोखरच आपल्या सामाजिक न्यायाच्या अजेंड्याचा भाग वाटत असेल, तर आदिवासी विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सरकारी संस्था अधिक मजबूत कराव्या लागतील. त्यांच्या हक्कांची जागा कोणतीही खासगी संस्था घेऊ शकत नाही. आदिवासींच्या नावाने राजकारण करणे सोपे आहे. त्यांच्या प्रश्नांवर घोषणा करणे त्याहून सोपे आहे. पण त्यांच्या हक्कांसाठी पैसा खर्च करणे, रिक्त पदे भरणे, वस्तीगृहांची अवस्था सुधारणे, प्रशासनाला जबाबदार धरणे आणि विद्यार्थ्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान देणेही खरी राजकीय परीक्षा आहे. म्हणूनच ४१० वस्तीगृहांचा हा मुद्दा छोटा समजण्याची चूक सरकारने करू नये. आज एका 'उपक्रमाचा' प्रश्न आहे; उद्या तो सरकारी नियंत्रणाचा प्रश्न होऊ शकतो. आज खासगी संस्थेला मर्यादित प्रवेश आहे; उद्या सरकारी व्यवस्था कुणाच्या हातात असेल, याची हमी कोण देणार? आदिवासींच्या नावाने 'गौरव' आणि त्यांच्या हक्कांच्या व्यवस्थेत 'खासगीकरण'हा विरोधाभास महाराष्ट्र स्वीकारणार नाही. फडणवीस सरकारने सामंजस्य कराराची संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी. निवड प्रक्रिया पारदर्शक करावी. विद्यार्थ्यांच्या वैचारिक स्वातंत्र्याची हमी द्यावी आणि वस्तीगृहांची मूलभूत जबाबदारी सरकार स्वतःकडेच ठेवावी. कारण आदिवासी विद्यार्थ्यांना कुणाच्या विचारसरणीची गरज नाही; त्यांना शिक्षणाची, सुरक्षिततेची, समान संधीची आणि संविधानाने दिलेल्या हक्कांची गरज आहे. आदिवासींच्या खांद्यावर हात ठेवून राजकारण करणे वेगळे आणि त्यांच्या हक्कांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहणे वेगळे. आता महाराष्ट्राने घोषणांपेक्षा कृतीचा हिशेब मागायला हवा.

## ताणतणावांनी ग्रासला मेंदू-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**



सध्याच्या स्पर्धात्मक युगात मानसिक ताणतणाव ही प्रत्येकाची रोजचीच बाब बनली आहे. कामाचा अतिभार, आर्थिक अनिश्चितता आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे मेंदूवर सतत आवाजावी ताण राहू शकतो. परंतु, हा ताण केवळ मानसिक स्तरावर राहून नसून तो संपूर्ण शारीरिक आरोग्याला आतून पोखरत असतो. वैद्यकीय भाषेत याला 'क्रॉनिक स्ट्रेस' किंवा 'प्रदीर्घ ताण' म्हणतात. जेव्हा मेंदू सतत तणावाखाली असतो, तेव्हा शरीर कॉर्टिसोल आणि ॲड्रेनालाईन यांसारखे हार्मोन्स अतिरिक्त प्रमाणात स्रवू लागते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी आणि रक्तदाब अचानक वाढतो. सततच्या मानसिक ताणामुळे मेंदूचा महत्त्वाचा भाग असलेल्या हिप्पोकॅम्पसची कार्यक्षमता मंदावते, ज्यामुळे स्मरणशक्ती कमी होणे, निर्णयक्षमता धोक्यात येणे आणि एकाग्रतेचा अभाव यांसारख्या समस्या उद्भवतात. याशिवाय, तणावाचा थेट संबंध रोगप्रतिकारकशक्तीशीही असतो. शरीरात सतत कॉर्टिसोलचे प्रमाण वाढल्यामुळे श्वेतपेशींची जंतूशी लढण्याची क्षमता कमी होते, ज्यामुळे वारंवार सर्दी,खोकला आणि तिर संसर्गजन्य आजार जडतात. बऱ्याचदा नैराश्य आणि तीव्र चिंता यासारखे आजार याच दीर्घकालीन तणावाच्या मुळापासुन विकसित होतात, ज्याचा शरीराच्या इतर अवयवांवरही विपरीत परिणाम होतो. ध्यानाचा सराव, प्राणायाम आणि योगासने केल्याने मज्जासंस्था शांतता मिळते आणि कॉर्टिसोलचे प्रमाण नियंत्रित होते. पुरेशी झोप घेणे आणि दररोजच्या धावपळीतून स्वतःसाठी काही वेळ काढणे मानसिक स्थैर्यासाठी उपयुक्त ठरते. आवडीचे छंद जोपासणे आणि मित्र-कुटुंबांशी मोकळेपणाने संवाद साधणे ताणतणाव हलका करण्यास मदत करते. तणावाची पातळी नियंत्रणाबाहेर जात असेल आणि नैराश्याची लक्षणे दिसू लागली, तर कोणत्याही संकोचाशिवाय मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे केव्हाही उत्तम ठरते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## नैसर्गिक भाज्या व पारंपरिक आहारसंस्कृतीचे संवर्धन आरोग्यवर्धक बाब-पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

### परळीत रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन ; 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' पुस्तकाचे प्रकाशन




**परळी वै.। प्रतिनिधी**

माती, निसर्ग आणि पारंपरिक आहार संस्कृतीशी असलेले नाते अधिक दृढ करण्याची सध्याच्या काळात नितांत गरज निर्माण झाली आहे.पारंपरिक आहारसंस्कृतीचे संवर्धन ही आरोग्यवर्धक बाब असून याची अधिकाधिक व्याप्ती वाढली पाहिजे असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.परळीत रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले यावेळी त्या बोलत होत्या.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि तालुका कृषी अधिकारी, परळी वैजनाथ यांच्या वतीने आयोजित रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर अध्यक्षस्थानी होते.महोत्सवाच्या निमित्ताने परळीच्या तालुका कृषी अधिकारी अर्चनाताई नागरगोजे यांच्या 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात तब्बल ७३ रानभाज्यांची माहिती देण्यात आली आहे. रानभाज्यांचे महत्त्व, त्यांची ओळख आणि त्यामागील पारंपरिक ज्ञान याची सखोल माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. यावेळी पुढे बोलताना नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की,पावसाळ्यात परिसरात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्या या पूर्वीच्या पिढ्यांच्या आहाराचा महत्त्वाचा भाग होत्या. या भाज्यांची ओळख, ऋतुमान, उपयोग तसेच पारंपरिक पद्धतीने त्यांची तयारी करण्याचे ज्ञान आजच्या बदलत्या जीवनशैलीत हळूहळू लोप पावत आहे. त्यामुळे अशा महोत्सवांच्या माध्यमातून हे पारंपरिक ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

### स्थानिक संपत्तीला बाजारपेठेची जोड आवश्यक

रानभाज्यांकडे केवळ पारंपरिक अन्न म्हणून न पाहता त्यातील आर्थिक क्षमता ओळखण्याची गरज आहे. शास्त्रीय पद्धतीने संकलन व संवर्धन, लागवडीसाठी योग्य प्रजातींचा अभ्यास, मूल्यवर्धन, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि बाजारपेठेशी जोडणी झाल्यास शेतकरी, महिला बचतगट तसेच ग्रामीण युवकांसाठी उत्पन्नाचे नवे मार्ग उपलब्ध होऊ शकतात. स्थानिक पातळीवर उपलब्ध नैसर्गिक संपत्तीचे ब्रँडिंग आणि प्रक्रिया उद्योग उभारल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते.

### अशा उपक्रमांना व्यापक स्वरूप हवे

आधुनिक विज्ञानाची जोड देत स्थानिक जैवविविधता आणि पारंपरिक आहारसंस्कृतीचे संवर्धन करणे आवश्यक आहे. रानभाजी महोत्सवासारख्या उपक्रमांमधून ग्रामीण संस्कृती, आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था या सर्वच क्षेत्रांना चालना मिळू शकते. त्यामुळे 'परंपरेपासून रोजगाराकडे आणि स्थानिक ज्ञानापासून शाश्वत विकासाकडे' वाटचाल करण्यासाठी अशा उपक्रमांना व्यापक स्वरूप देण्याची अपेक्षा या महोत्सवातून व्यक्त करण्यात आली.



## तिसऱ्या श्रावण सोमवारी सोमेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित असलेल्या बार्शी रोडवरील श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन या ठिकाणी तिसऱ्या सोमवार निमित्त बीड शहरातील व पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी श्री सोमेश्वर महादेवाचे व श्री हनुमान जी महाराजांचे दर्शन घेऊन या ठिकाणी प्रसादाचा लाभ घेतला अनेक भाविक भक्त बीड शहरांमधील श्री सोमेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी आले होते अतिशय चांगल्या प्रकारे उत्कृष्ट शेवंतीचे फुले बेलाची पाने विक्री करणाऱ्याच्या माध्यमातूनउपस्थित होतेअतिशय शिस्तीमध्ये या ठिकाणी दर्शनाची व्यवस्था देखील मंदिराचे ट्रस्टी यांच्यावतीने तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील व जानोळे मामा प्रदान पवार श्रीहरी वाघमारे आत्माराम शिराळे एडवोकेट गोविंद शिराळे सदाशिव पत्रकार भागवत वैद्य पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर शेजाळ बबन वनवे परंडकर आप्पा इत्यादी सह विश्वस्त मंडळी उपस्थित सह शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस बांधव व पोलीस भगिनी उषा मॅडम चाटे कविता मॅडम सानप व होमगार्ड यांनी अतिशय उत्कृष्टपणे यांनी शिवाजीनगर पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली चांगल्या प्रकारे या ठिकाणी बंदोबस्त केला यामुळे त्यांचे देखील कार्याचे सर्वत्र भाविक भक्तांमधून कौतुक होत आहे.

## पान १ वरून...

### खरीप पेरणी ९५ टक्क्यांवर; अपुऱ्या

चंद्रपूरमध्ये ८८ टक्के, तर नागपूर आणि भंडारा जिल्ह्यांत प्रत्येकी ९० टक्के पेरणी झाली आहे. कोकण विभागातील खरीप पेरणीचे प्रमाण सर्वात कमी असून, ते सरासरीच्या केवळ ८३ टक्क्यांवर आहे. विभागात ३ लाख २३ हजार ८८५ हेक्टरवर पेरणी झाली आहे. रायगडमध्ये केवळ ६७ टक्के, रत्नागिरीत ७१, सिंधुदुर्गात ८४, तर ठाणे आणि पालघरमध्ये ९६ टक्के पेरणी झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात सरासरीच्या ९३ टक्के, तर लातूर विभागात ९४ टक्के पेरणी झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील जालना जिल्ह्यात पेरणी ९० टक्क्यांवर आहे. लातूर विभागात हिंगोली सर्वाधिक पिछाडीवर असून तेथे केवळ ८१ टक्के पेरणी झाली आहे. नांदेडमध्ये मात्र ९७ टक्के पेरणी झाली आहे. राज्यातील एकूण पेरणीचे प्रमाण ९५ टक्क्यांवर पोहोचले असले तरी जिल्हानिहाय परिस्थितीत मोठी तफावत आहे. काही जिल्ह्यांनी सरासरी क्षेत्र ओलांडले असताना काही जिल्ह्यांमध्ये अजूनही सरासरीच्या ७० ते ८० टक्क्यांदरम्यानच पेरणी झाली आहे. त्यामुळे आगामी काळातील पावसावर उर्वरित पेरणीसोबतच आधीच पेरलेल्या पिकांचे भवितव्यही अवलंबून आहे.

--------------

### राज्यातील दोन कोटी

नोंदणीमुळे तब्बल २,०६,८८,४८७ (२१.१४%) मतदारांची नावे सध्याच्या यादीत समाविष्ट झालेली नाहीत. या नव्या प्रारुप यादीत पुरुष मतदारांची संख्या ३,९५,८९,९०५ इतकी आहे, तर महिला मतदारांची संख्या ३,७५,७२,५७० एवढी नोंदवण्यात आली आहे. याशिवाय ३,०८७ तृतीयपंथी मतदारांचा यादीत समावेश आहे. तुमचे नाव मतदार यादीत सुरक्षित आहे की नाही, हे तपासणे आता प्रत्येक नागरिकासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. मतदारांनी त्यांचे नाव निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मसुद्यात आहे की नाही हे तपासण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. लिंकवर जाऊन प्रारुप मतदार यादी २०२६ यावर आपले नाव तपासावे. वगळण्यात आलेल्या किंवा नवीन नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. नागरिकांना आपले नाव तपासण्यासाठी आणि दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. यानंतर सर्व अर्जांची छाननी करून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदारही यासाठी पात्र ठरणार आहेत.

--------------

### उपोषण सोडणार नाही, मुंबईत

५८ लाख नोंदी सापडलेल्या नाहीत. एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांना फसवलं, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगावे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, मी फसवलेले नाही, ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, असे स्पष्ट करावे. असे आव्हान जरांगेंनी सरकारला दिले आहे.

------------

### मराठी पत्रकार परिषदेची सूत्रे

एस.एम. देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, माजी राष्ट्रीय अध्यक्ष गजानन नाईक, परिषदेचे राज्य सरचिटणीस प्राचार्य सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर भाई शेख, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष सनी शिंदे, राज्य उपाध्यक्ष तथा दैनिक राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांच्यासह राज्यभरातून आलेले परिषदेचे राज्य उपाध्यक्ष, विभागीय सचिव, जिल्हाध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविवारी सकाळी ११ वाजता सांगली येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये माजी अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर यांनी आपल्या पदाची सूत्रे नूतन अध्यक्ष शरद काटकर यांच्या हाती सोपवली. यावेळी शिवराज काटकर यांनी सर्वांच्या सहकार्याने या कार्यकाळात अधिक चांगले काम होईल. महाराष्ट्रातील प्रत्येक सदस्याला अडचणीच्या काळी मदत होईल, अशी ग्वाही यावेळी दिली. कृष्णा मॅरेज हॉलमध्ये झालेल्या या बैठकीमध्ये एस.एम. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सर्वांना आवश्यक त्या सूचना केल्या. आगामी काळातही परिषद चांगल्या पद्धतीने काम करणार असून शिवराज काटकर यांच्या कर्मभूमीत सांगली येथे हा सोहळा होतोय याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले. यावेळी शिवराज काटकर यांनी परिषदेच्या सर्व सदस्यांना अधिस्वीकृतीसाठी सर्वतोपरी मदत तसेच ज्येष्ठ पत्रकारांना मानधनाविषयी सर्वतोपरी मदत केली जाईल अशी ग्वाही दिली. या बैठकीला मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष शरद पाबळे, गजानन नाईक, मिलिंद आष्टीवकर, परिषदेचे सरचिटणीस प्राचार्य सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर भाई शेख, उपाध्यक्ष गणेश मोकाशे, संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे, समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके आदींसह राज्यभरातून आलेले परिषदेचे विभागाचे सचिव, सोशल मीडियाचे सर्व पदाधिकारी, जिल्हाध्यक्षांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याचवेळी पश्चिम महाराष्ट्राचा विभागीय मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध जिल्ह्याच्या वतीने शिवराज काटकर यांचा सत्कार करण्यात आला. डिजिटल मीडियासाठी यावेळी कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेला उदंड प्रतिसाद मिळाला. राज्यभरातून सोशल मीडियासाठी काम करणारे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांना तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

--------------

### राज्यातील पाच हजार सहा.प्राध्यापकांच्या

आली आहे. महाविद्यालयांनी भरतीसाठीच्या जाहिरातींना विद्यापीठाची मंजुरी घेणे आणि त्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करणे आवश्यक आहे, तसेच अर्ज ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतींनी स्वीकारले जाऊ शकतात. उमेदवारांची निवड विद्यापीठ अनुदान आयोगाने निश्चित केलेल्या निकषांनुसार केली जाईल आणि सामाजिक तसेच समांतर आरक्षणाचे धोरण पाळणे अनिवार्य असेल. निवडीसाठीचे निकष आणि निवडलेल्या उमेदवारांची यादी महाविद्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळांवर प्रकाशित करावी आणि संबंधित तपशील विद्यापीठाला सादर करावा. संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग अनिवार्य करण्यात आले असून, मुलाखतीच्या तारखेपासून किमान एक वर्षापर्यंत हे रेकॉर्डिंग गोपनीय दस्तऐवज म्हणून सुरक्षित ठेवण्याचे निर्देश महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. जर एखादी तक्रार, आक्षेप, चौकशी किंवा न्यायालयीन अथवा वैधानिक कार्यवाही प्रलंबित असेल, तर संबंधित प्रकरण निकाली निघेपर्यंत हे रेकॉर्डिंग नष्ट करता येणार नाही, असेही यात म्हटले आहे.

-------

### इथेनॉल याचिकेत हस्तक्षेप करण्यास

उत्तर द्यायचे आहे. आम्हाला आम्ही काय खरेदी करतोय याची माहिती मिळवण्याचा अधिकार आहे. अटॉर्नी जनरल यांनी ही याचिका एक प्रॉक्सी पिटिशन असून सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी याच प्रकारची एक याचिका फेटाळून लावली होती अशी आठवण करून दिली. यानंतर न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावत याचिकाकर्त्याला योग्य दिलासा मिळावा यासाठी त्यांनी उच्च न्यायालयात याचिका करू शकता असा पर्याय देखील ठेवला.

**याचिकेत केली होती ही मागणी**

याचिकार्त्यांने संबंधित प्रशासनाने प्रत्येक पेट्रोल डिस्पेन्सिंग नोझलमधून किती टक्के इथेनॉल सोडले जाते याची निश्चित आणि युनिफॉर्म माहिती द्यावी, असे आदेश न्यायालयाने द्यावेत अशी विनंतइी या याचिकेतून केली होती. तसेच या याचिकेत पेट्रोल पंपावरील बिलामध्ये देखील यात किती टक्के इथेनॉल मिसळण्यात आले आहे याची माहिती देण्याचे आदेश न्यायालयाने द्यावेत अशी मागणी करण्यात आली होती. तसेच याचिकाकर्त्याने कोणत्या गाडीला कोणते इथेनॉल ब्लेंड पेट्रोल योग्य आहे. मॅन्युफॅक्चरर, गाडी मॉडेल, इंजिन टाईप आणि मॅन्युफॅक्चरिंग इअर संबंधीची अधिकृत सर्वांना ॲक्सेस करता येईल अशी माहिती मिळावी अशी देखील मागणी केली होती.

---------------

### सीजेपीच्या मोर्चावर

असलेल्या खंडपीठाने याचिकाकर्त्याला निर्देश दिले की, त्यांनी आपली बाजू किंवा चिंता नीट-युजी आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलीस हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी न्यायालयाने स्थापन केलेल्या उच्च-स्तरीय चौकशी समितीसमोर मांडावी. हे प्रकरण प्रलंबित याचिकांसोबत सूचीबद्ध केले जावे आणि त्यावर १० सप्टेंबर रोजी सुनावणी घेतली जावी, असे सांगत खंडपीठाने या प्रकरणी नोटीस जारी केली. न्यायालयाने म्हटले की, आयोजकांनी कायदा व सुव्यवस्था राखणे अपेक्षित आहे, तर काय स्वीकारार्ह आहे आणि काय नाही, हे ठरवण्याची जबाबदारी पोलीस आणि इतर अंमलबजावणी यंत्रणांची आहे. त्यांनी त्या चौकटीत राहूनच कृती करावी अशी आमची अपेक्षा आहे. दोन्ही बाजूंनी कायद्याचा आदर केला जाईल, योग्य वर्तन केले जाईल आणि देशाच्या कायद्याचे पालन केले जाईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. कॉकरोच जनता पार्टीने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत निषेध मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. परीक्षेतील अनियमिततेबाबतचे आंदोलन मागे घेण्यासाठी २५ जुलै रोजी केंद्र सरकारने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नाही, असा आरोप या गटाने केला आहे. इंडिया गेट ते दिल्ली पोलीस मुख्यालय अशी रॅली काढण्याची योजना सीजेपीने जाहीर केली असली, तरी त्याबाबत कोणतीही विनंती आपल्याला प्राप्त झाली नसल्याचे दिल्ली पोलिसांनी यापूर्वी सांगितले होते.

**विद्यार्थ्यांवरील एफआयआर मागे घेण्यासाठी सरकार सुप्रीम कोर्टात**

जुलै महिन्यातील विद्यार्थी आंदोलनासंदर्भात दाखल झालेले एफआयआर रद्द करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय आता एक मार्ग उपलब्ध करून देऊ शकते. आंदोलक विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल झालेले एफआयआर रद्द करण्यासाठी घटनेच्या कलम १४२ अंतर्गत न्यायालयाच्या विशेष अधिकारांची मागणी करणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सोमवारी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर हा विषय मांडला आणि तातडीच्या सुनावणीची विनंती केली. जुलैमध्ये पेपरफुटीच्या आरोपांवरून झालेल्या देशव्यापी विद्यार्थी आंदोलनानंतर, आंदोलन संपवण्यासाठी विद्यार्थ्यांवरील खटले मागे घेण्याची मागणी सरन्यायाधीशांनी केली होती.

----------

### सिंधू जल करारासंदर्भात

हा करार पूर्णपणे कार्यरत राहावा आणि भारताने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे सुरू ठेवावे, असे म्हटले होते. त्यानंतर काही वेळातच परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने यावर तीव्र प्रतिक्रिया नोंदवली. भारताने हा निकाल आणि तो देणाऱ्या संस्थेचे अधिकार या दोन्ही गोष्टी फेटाळून लावल्या आहेत. सरकारने म्हटले आहे की, ''बेकायदेशीरपणे स्थापन झालेल्या या कथित लवाद न्यायालयाने सिंधू जल कराराच्या अंतरिम उपाययोजना आणि सद्यस्थितीबाबत आपला तथाकथित निकाल दिला आहे.'' ''जागतिक बँकेने या कथित न्यायालयाची स्थापना कराराच्या अटींचे स्पष्ट उल्लंघन करून केली आहे. या बेकायदेशीर संस्थेने यापूर्वी दिलेले सर्व निर्णय जसे भारताने ठामपणे नाकारले आहेत, तसाच हा तथाकथित निकालही भारत स्पष्टपणे फेटाळत आहे,'' असेही भारताने म्हटले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले की, भारताने कायद्याच्या दृष्टीने या लवाद न्यायालयाचे अस्तित्व कधीही मान्य केलेले नाही आणि त्यांच्या कामकाजाला व पूर्वीच्या निर्णयांना सातत्याने विरोध केला आहे. ''भारताने या बेकायदेशीर आणि कथित लवादाच्या अस्तित्वाला कधीही कायदेशीर मान्यता दिलेली नाही. या कथित लवादाची स्थापनाच सिंधू जल कराराचे मोठे उल्लंघन आहे, ही भारताची ठाम भूमिका राहिली आहे,'' असे मंत्रालयाने सांगितले. एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध कमालीचे ताणले गेले होते. या पार्श्वभूमीवर भारताने सिंधू जल करार स्थगित ठेवला. तेव्हापासून, पाकिस्तानी नेत्यांनी वारंवार पाण्याला आपली रेड लाईन म्हटले असून भारताला या निर्णयावरून इशारे दिले आहेत. काहींनी तर कराराच्या निलंबनाला युद्धाची कृती असेही संबोधले आहे. मात्र, करार स्थगित ठेवण्याचा आपला निर्णय बदललेला नाही, यावर भारत ठाम आहे. ''सिंधू जल करार स्थगित ठेवण्याचा भारताचा निर्णय अद्याप कायम आहे,'' असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

## ग्रामरोजगार सहायकास लाच घेताना अटक!

**बीड । प्रतिनिधी**

**लिंबारुई येथील ग्रामरोजगार सहायक याला साठ हजार रुपयांची लाच घेताना छत्रपती संभाजीनगर येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. या कारवाईने खळबळ उडाली आहे.मुकेश सोनाजी भोकरे (वय ४७), ग्रामरोजगार सहायक, लिंबारुई, ता. बीड, असे लाच स्वीकारताना पकडण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.**

तक्रारदाराने नरेगा योजनेअंतर्गत शेतविहिरीचे काम केले होते. या कामाचे बिल मंजूर करण्यासाठी भोकरे याने तक्रारदाराकडे ६१ हजार रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने पडताळणी केली. त्यानंतर तडजोडीअंती ६० हजार रुपये देण्याचे ठरले. ही लाचेची रक्कम स्वीकारत असताना एसीबीच्या पथकाने भोकरे याला रंगेहाथ पकडले. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर एसीबीच्या अधीक्षक माधुरी कांगणे, अपर अधीक्षक शशिकांत शिंगारे आणि प्रभारी उपअधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक बाळासाहेब शिंदे, पोलीस निरीक्षक भास्कर नवले, अनवेज शेख, प्रकाश डोंगरदिवे आणि रामेश्वर ताठे यांच्या पथकाने केली.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात

### बीड जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करा– परमेश्वर सातपुते

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात यावर्षी पावसाने ओढ दिल्याने ग्रामीण भागात गंभीर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्याचे महत्त्वाचे महिने उलटून जात असतानाही अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे अनेक भागांतील खरीप पिके करपून गेली आहेत. नदी–नाले, ओढे, तलाव व बंधारे कोरडे पडले असून विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीतही मोठी घट झाली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केली आहे.



खरीप हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यासह विविध पिकांची पेरणी केली. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला. मात्र पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने पाठ फिरवल्याने अनेक शेतांमधील उभी पिके करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, पीक वाचवायचे कसे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

पावसाअभावी जिल्ह्यातील अनेक जलस्रोतांमध्ये पाण्याचा ठणठणाट आहे. पावसाळ्यात पाण्याने भरून जाणारे नदी–नाले, ओढे, तलाव आणि बंधारे यंदा अनेक ठिकाणी कोरडेच राहिले आहेत. जलसाठा निर्माण न झाल्याने भूजल पुनर्भरणालाही मोठा फटका बसला आहे. परिणामी विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी झपाट्याने खाली जात असून आगामी काळात पिण्याच्या पाण्याबरोबरच पशुधनाच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. त्यातच शेतातील हिरवा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर जनावरे जगविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. भविष्यात चारा महागल्यास त्याचा अतिरिक्त आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडणार आहे. त्यामुळे शासनाने केवळ पीक नुकसानीचा विचार न करता पशुधनासाठी चारा आणि पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणीही सातपुते यांनी केली.

शेतकऱ्यांनी कर्ज काढून तसेच उधारी करून पिकांमध्ये पैसा गुंतवला आहे. आता पावसाअभावी संपूर्ण हंगाम हातातून जाण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पिके करपून जात असताना शासनाने केवळ कागदोपत्री अहवालांची वाट न पाहता प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी परमेश्वर सातपुते यांनी केली.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी किमान एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी ठाम मागणी सातपुते यांनी केली आहे. तसेच पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, पशुधनासाठी पाणी आणि पुढील हंगामासाठी आवश्यक मदत याबाबत शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### कंकालेश्वर मंदिरात ३ ते ११ सप्टेंबरदरम्यान शिवमहापुराण कथा

बीड । प्रतिनिधी

येथील ऐतिहासिक श्री कंकालेश्वर मंदिरात ३ ते ११ सप्टेंबरदरम्यान दररोज दुपारी २ ते ५ वाजता शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत गोविंद गिरीजी महाराज यांचे पट्टशिष्य प.पू. पवनशास्त्री धानोरकर महाराज यांच्या वाणीतून कथा होणार आहे. ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता बालाजी मंदिरातून ग्रंथ व महाराजांची शोभायात्रा कंकालेश्वर मंदिराकडे निघणार आहे. ८ व ९ सप्टेंबर रोजी लिंगार्चन, कुंकूमार्चन व रुद्राक्ष वाटप होईल. ११ सप्टेंबर रोजी कथेची सांगता व दुपारी १ ते ३ या वेळेत महाप्रसाद होणार आहे. शिवभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पुजारी संजय कल्याणराव गुरव महाराज यांनी केले आहे.

# माजलगावात भररस्त्यात वाढदिवस साजरा करून दहशत माजवणाऱ्यांवर पोलिसांचा बडगा

## सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडिओची माजलगाव शहर पोलिसांकडून दखल

माजलगाव । प्रतिनिधी

सार्वजनिक रस्त्यावर वाढदिवस साजरा करून परिसरात दहशत आणि भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर माजलगाव शहर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. याप्रकरणी मुख्य संशयित अजीज सालेम चाऊस याच्यासह त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपीने पोलिसांसमोर या कृत्याबाबत माफी मागितली आहे.

माजलगाव शहरातील बसस्थानकासमोर अजीज सालेम चाऊस याने आपल्या वाढदिवसानिमित्त सार्वजनिक रस्त्यावर गर्दी जमवून अशा पद्धतीने कृत्य केले, ज्यामुळे परिसरात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता.

पोलिसांची तत्पर कारवाई व गुन्हा दाखलसोशल मीडियावरील व्हायरल व्हिडिओची तात्काळ गंभीर दखल घेत माजलगाव शहर पोलिसांनी धडक कारवाई केली. पोलिसांनी अजीज सालेम चाऊससह इतरांविरुद्ध गुन्हा रजि. क्र. २८५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८५, १२६(२) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात अजीज सालेम चाऊस, सिकंदर चाऊस, दिनेश आहाड, निहाल पटेल, महेंद्र कांबळे, करण कांबळे, वीर बलवीर अल्हांडे, अक्षय पोपटके व कृष्णा (सर्व रा. टाकरवन) यांचा आरोपी म्हणून समावेश आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी अजीज चाऊस याच्याकडून माफीनामा लिहून घेत भविष्यात असे कृत्य न करण्याची कडक समज दिली आहे.

इतर १० ते १५ जणांचा शोध सुरू

व्हायरल व्हिडिओमध्ये आरोपींसोबत इतर १० ते १५ इसमही वाढदिवस साजरा करताना दिसून येत आहेत. या इसमांची ओळख पटवून गुन्ह्यातील त्यांचा सहभाग निश्चित करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. तपासात सहभाग निष्पन्न होताच त्यांच्यावरही प्रचलित कायद्यानुसार कडक कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### पोलीस प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

सार्वजनिक रस्ते, चौक अथवा बसस्थानक परिसरात वाढदिवस किंवा अन्य कारणास्तव कायदा–सुव्यवस्था बिघडवणे, नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे अथवा वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी अशी कृत्ये करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अशा घटनांची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास द्यावी.

– पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड



# रोटरी क्लबची सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद : कवयित्री गुंजन पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

रोटरी चे जगभरातील सामाजिक बांधिलकीचे कार्य कौतुकास्पद आणि अभिमानास्पद असल्याचे गौरवोद्गार जळगाव येथील प्रसिद्ध कवयत्री गुंजन पाटील यांनी माजलगाव येथील रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या पदग्रहण प्रसंगी काढले.

रो.राहुल लंगडे यांनी अध्यक्ष म्हणून तर रो.दामोदर संदीकर यांनी सचिव म्हणून या प्रसंगी सूत्र हाती घेतली.मावळते अध्यक्ष रो.विनोद बजाज व मावळते सचिव रो.दिगंबर महाजन यांनी पदभार दिला.

रोटरी इंटरनेशनल चे प्रांतपाल रो.सतीश लोणीकर यांनी या प्रसंगी रोटरी ची भूमिका विशद केली आणि माजलगाव क्लब च्या कामाचे




कौतुक केले. पदग्रहणाचे औचित्य साधून क्लबच्या वतीने प्लास्टिक हटाव देश बचाव या अंतर्गत पर्यावरण पूरक पिशव्यांचे उपस्थितांना वितरण करण्यात आले. निर्माल्यापासून खत निर्मितीसाठी परिसरातील दोन मंदिरांना किट चे वाटप करण्यात आले तर इ लर्निंग अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संगणका चे वितरण करण्यात आले

मावळते अध्यक्ष रो.विनोद बजाज यांनी मागील वर्षीच्या कार्याचा अहवाल सादर केला नूतन अध्यक्ष रो.राहुल लंगडे यांनी येत्या वर्षात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती दिली कवयत्री गुंजन पाटील यांनी विविध भाव भावनांचे पट उलगडत विविध कविता सादर करीत श्रोत्यांची मने जिंकली नूतन सचिव दामोदर संदीकर यांनी आभार व्यक्त केले तर कार्यक्रमाचे ओघवते सूत्र संचलन रो.स्मिता लिंबगावकर आणि रो.लता जोशी यांनी केले. कार्यक्रमास माजी आमदार मोहनरावकाका सोळंके, उपाध्यक्ष सहालभैय्या चाऊस मा.मोहनराव जगताप,मा.ऐश्वर्याताई सोळंके, मा.उज्वलाताई होके पाटील यांच्यासह शहरातील राजकीय,सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय,क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते तर तरुण श्रोत्यांनी गर्दी केली होती जिल्ह्यातील बीड, धारूर, केज,अंबाजोगाई, गेवराई,वडवणी येथील रोटरी क्लबच्या सदस्यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोजेक्ट चेयरमन रो.शशिकिरण गडम आणि सर्व रोटरी सदस्यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरुन...

### जिल्हाधिकारी व पोलीस

त्यांच्यावरही लवकरच एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई प्रस्तावित असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

सदरची धडक कामगिरी बीडचे जिल्हादंडाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या मंजुरीनंतर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक (बीड) श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी (गेवराई) श्री. अनिल कटके, उपविभागीय पोलीस अधिकारी (माजलगाव) श्री. अशोक अनंत्रे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे (डउइ) पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यात पो.नि. विजय रामोड, सपोनि मनोज निलंगेकर (पो.स्टे. तलवाडा), सचिन इंगळे (पो.स्टे. चकलंबा), सपोनि जाधव (पो.स्टे. शिरूर कासार) तसेच पोउपनि स्वप्नील कोळी, राजू राठोड, श्रीराम खटावकर, सपोउपनि अभिमन्यू औताडे, अंमलदार कुलकर्णी, तांदळे, अंजन गडदे, संजय राठोड, गोविंद बाबरे, बहीरवाळ, कांबळे, यादव, वडमारे, घोडके, जोगदंड, पठाण, मराडे, चव्हाण, सलगर आदींनी सहभाग घेतला.

### माजलगाव नगरपरिषदेच्या

' स्वच्छता: शहरातील प्रत्येक गल्ली आणि मुख्य रस्त्यांची तात्काळ झाडू मारून पूर्ण साफसफाई करण्यात यावी.

औषध फवारणी: मलेरिया, डेंग्यू यांसारख्या जीवघेण्या आजारांना अटकाव करण्यासाठी संपूर्ण माजलगाव शहरात मलेरिया नाशक औषधांची फवारणी करावी.

दोषींवर गुन्हे दाखल करा: ज्या 'हरामखोर' आणि कामचोर कर्मचाऱ्यांनी किंवा कंत्राटदारांनी थातूरमातूर साफसफाई करून जनतेच्या पैशांची उधळपट्टी केली आहे, त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत. अंतिम इशारा: जर नगरपरिषदेने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर शहरातील संपूर्ण कचरा उचलून थेट माजलगाव नगरपरिषदेच्या कार्यालयात आणून टाकणार, असा थेट आणि आक्रमक इशारा नवीद सिद्दिकी यांनी दिला आहे. या आंदोलनाला माजलगावमधील सर्वसामान्य नागरिक आणि बांधकाम कामगारांचा मोठा पाठिंबा असून, प्रशासनाने वेळीच जागे व्हावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### चौसाळ्यात पावसाळ्यापूर्वीच

माध्यमातून रस्ते विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असतानाही संबंधित कामे दर्जेदार पद्धतीने होत नसतील, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी आणि निकृष्ट कामाबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी अशोक लोढा यांनी केली आहे.

### अपत्य न झाल्याने, स्कार्पिओसाठी

कंटाळून वैष्णवीने २७ ऑगस्ट २०२६ रोजी विषारी औषध प्राशन केले. प्रकृती गंभीर झाल्याने तिला छत्रपती संभाजीनगर येथील गजानन हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना २८ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास तिचा मृत्यू झाला. मृत वैष्णवीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून पिंपळनेर पोलीस ठाण्यात पती सचिन नवनाथ रहाडे, सासरे नवनाथ रहाडे, सासू मोहरबाई रहाडे आणि दीर अमोल रहाडे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी सचिन रहाडे याला अटक केली असून नवनाथ रहाडे, मोहरबाई रहाडे आणि अमोल रहाडे यांचा शोध सुरू आहे. शनिवारी, ३० ऑगस्ट रोजी दुपारी घोडका राजुरी येथे पोलीस बंदोबस्तात वैष्णवीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.

### आष्टीत भेसळखोरांवर

प्रवृत्तींमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६९/२०२६ अन्वये अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी गुन्ह्यातील संशयित बाबू ऊर्फ लक्ष्मण गोपाळघरे, रा. नागोबाचीवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर यास अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. तसेच कैलास हंबर्डे यासही अटक करण्यात आली असून, दिलीप ज्ञानदेव राव हंबर्डे यास ३१ ऑगस्ट रोजी अटक करून न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

अन्नात भेसळ करणाऱ्यांना कायद्याचा दणका!

अन्नपदार्थांमध्ये भेसळ करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणे हा गंभीर प्रकार असून, अशा अवैध व्यवसायाला आळा घालण्यासाठी आष्टी पोलिसांनी घेतलेली ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे. भेसळीच्या मालाचा नेमका पुरवठा कुठे आणि कोणाला केला जात होता, या संपूर्ण साखळीचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. निरीक्षक भुतकेर, पोलीस ठाणे आष्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. आष्टी पोलिसांच्या या कारवाईमुळे अन्नभेसळीच्या काळ्या धंद्यावर मोठा घाव बसला असून, या प्रकरणामागील संपूर्ण नेटवर्क उघड होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सतीशचा संघर्ष पुनर्वसनला शैक्षणिक दिशा देईल – दत्ता कांबळे

### पुनर्वसनमध्ये शैक्षणिक चळवळीला गती : सतीश कांबळे सह कुटुंबाचा सत्कार



माजलगाव । प्रतिनिधी

ब्रम्हगाव येथील श्री सतीश महादेव कांबळे यांची पवित्र पोर्टल मार्फत होणाऱ्या शिक्षक भरतीमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा व वडील महादेव कांबळे व आई सागरबाई, छोटा बंधू सचिन कांबळे सह कुटुंबीयांचा पुनर्वसन सदस्य तथा काँग्रेसचे अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या वतीने कौटुंबिक सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे पुनर्वसन तथा काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी म्हटले की, सतीशने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले आहे. पुनर्वसनसारख्या भागात जिथे आजही अनेक समस्या आहेत, तिथे सतीशने मिळवलेले यश हे इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. सतीशचा हा शैक्षणिक संघर्ष निश्चितच संपूर्ण पुनर्वसनला नवी शैक्षणिक दिशा देईल आणि इथे शैक्षणिक चळवळीला अधिक गती येईल. सतीशच्या या यशामुळे पुनर्वसनमधील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल नवा उत्साह निर्माण झाला असून त्याच्या कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, ब्रम्हगाव येथील वरिष्ठ मार्गदर्शक अशोक कांबळे,जेष्ठ मार्गदर्शक अशोक शिंदे,प्रा. सुनील कांबळे सर, प्रा. सुधाकर कांबळे सर यांच्या सह प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते समाज बांधव उपस्थित होते.

# क्रांतीवीर गणेश मंडळाची कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी अतिश शिंदे तर उपाध्यक्षपदी दिनेश रांजवण यांची निवड

माजलगांव । प्रतिनिधी

शहरातील नामअंकित गणेश मंडळापैकी माजलगावची शान क्रांतिवीर गणेश मंडळाची नुकतीच बैठक घेण्यात आली त्यात मोठ्या संख्येने मंडळाचे जेष्ठ तथा युवक उपस्थित होते सर्वांनीमते पुढील प्रमाणे मंडळाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली अध्यक्ष: अतिश शिंदे ,उपाध्यक्ष: दिनेश रांजवण ,सचिव:मेघराज सोळंके, बालाजी रांजवण,सहसचिव : राजेश कोंबडे, निशिकांत पाटील कोषाध्यक्ष: योगेश कुलथे, विनोद शिंदे लैझिम प्रमुख:–अभिजीत कोंबडे, अमोल कोंबडे, सुमित साळवे,निलेश गरुड, परमेश्वर धारक सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख: शुभम मोगरेकर, शुभम गरुड,अमोल धारक,सुमित राऊत आरोग्य शिबीर प्रमुख:अमर रांजवण, महेश होके, राहुल बावणे, विक्रम शिंदे. कार्याध्यक्ष :–दत्ता शिंदे,सुनील गायगवे




गणेश मंडळाचे वैशिष्ट्ये म्हणजे माजलगांव शहर पोलिस स्टेशन वतीने गणेश उत्सव २०२४ गणराया आव्हाड योजना प्रथम क्रमांक क्रांतिवीर गणेश मंडळाचा आला होता २१ हजार रुपये पारितोषिक व सन्मान चिन्ह भेटले होते पोलीस स्टेशन,आमदार चषक अशा अनेक पुरस्काराने सन्मानित तसेच सामाजिक कार्यात मंडळांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आरोग्य शिबिर वृक्षरोपण रक्तदान अशा अनेक कार्यक्रम दरवर्षी आयोजन करण्यात येते याही वर्षे वरील कार्यक्रम आयोजन करण्याचे आयोजिले आहे

मंडळाचे सल्लागार दिपकराव मोगरेकर,सतीश गरूड,रामेश्वर धारक, माणिकराव शिंदे, बंडूराव कोंबडे, महादेव कोंबडे, प्रशांत खोले, खंडू देवकते, नितीन गरूड,दत्ता शिंदे,सिद्धेश्वर धारक,बंटि ललवाणी,पप्पु गायगवे,मदन राऊत, सिद्धेश्वर काजळे, किशोर काजळे,पांडुरंग कुलथे,अरबाज पठाण,दिलवर खान, गणेश उबाळे,अक्षय धारक,योगेश कुलथे,रामा शिंदे,प्रकाश भागवत, सचिन करडे,रामा जूनाळ,आकाश कोंबडे,प्रशांत गायगवे,रामा काजळे,मयूर देवकते, अशोक कोंबडे, अरिहंत ललवाणी,कृष्णा इतापे, राहुल तांदळे, शहाजी सरक,शशिकांत टाक, ,राहुल दळवी,अभिषेक धारक,अवधूत लिंगशेकर, गोविंद राऊत,श्याम गायगवे,,दिगांबर शिंदे, किशोर गर्जे, गजानन बावणे,अशोक कुलथे,अजित सावंत,वैभव रांजवण, गणेश मोगरेकर,वरद धारक,आशिष कोंबडे,विशाल शिंदे,ओमकार गरूड.आदी सभासद उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; एकूण मतदारांची संख्या १९ लाख ५३ हजार ४२०

## १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर, दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, दिनांक १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रम बीड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत आज, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण १९ लाख ५३ हजार ४२० मतदारांची नोंद झाली आहे. यामध्ये १० लाख ३५ हजार ९५९ पुरुष मतदार, ९ लाख १७ हजार ४४१ स्त्री मतदार आणि २० इतर मतदारांचा समावेश आहे.

विधानसभानिहाय मतदार संख्या खालीलप्रमाणे:

- ✻ गेवराई: ३,४५,९६६
- ✻ माजलगाव: ३,१४,६६८
- ✻ बीड: ३,०४,६६०
- ✻ आष्टी: ३,६०,९०६
- ✻ केज: ३,४०,११९
- ✻ परळी: २,८७,१०१

–डऊ्र मतदारांची माहिती

ज्या मतदारांनी BLO कडे गणनापत्रक (Enumeration Form) जमा केलेले नाही, अशा २ लाख ४० हजार ४७७ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नाहीत. यामध्ये ५०,९१३ मयत, ५६,८८६ गैरहजर, १,०३,३३४ कायमस्वरूपी स्थलांतरित, ८२८ इतर आणि २८,५१६ यापूर्वीच नोंदणी झालेले मतदार आहेत. मयत मतदार वगळता इतर कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये म्हणून ही यादी स्थानिक प्रशासकीय कार्यालये आणि beed.gov.in संकेतस्थळावर अवलोकनासाठी उपलब्ध केली आहे.

दावे व हरकती ३० सप्टेंबरपर्यंत स्वीकारणार

३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येतील. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना नाव नोंदणीसाठी नमुना ६ भरावा लागेल. नाव वगळण्यासाठी नमुना ७ आणि नोंदीमध्ये दुरुस्ती वा बदल करण्यासाठी नमुना ८ भरता येईल. हे सर्व अर्ज voters.eci.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहेत.

अर्जदारांनी वैयक्तिकरीत्या अर्ज सादर करणे आवश्यक असून एकगठ्ठा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत; मात्र एकाच कुटुंबातील सदस्यांचे अर्ज एकत्रितपणे स्वीकारले जाऊ शकतात. राजकीय पक्षांच्या इङ्ज प्रतिनिधींना एका दिवसात १० दावे/हरकती सादर करण्याची मुभा आहे.

मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण

१३०० पेक्षा जास्त मतदार असलेल्या मतदान केंद्रांचे विभाजन करण्यात आले असून, सुसूत्रीकरणाच्या प्रक्रियेनंतर बीड जिल्ह्यात आता एकूण २,३९३ मतदान केंद्रे असणार आहेत.

नागरिकांसाठी मदत कक्ष

पुनरीक्षण कालावधीत नागरिकांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हास्तरावर मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यासाठी टोल फ्री क्रमांक १९५० व ०२४४२–२२२१८५ सुरू करण्यात आले असून ते सकाळी ६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत कार्यरत राहतील. याशिवाय, निवडणूक आयोगाच्या एउखछएढ पमधील 'इेज्ञ र लरश्रश्र थळींह इङ्ज' या सुविधेचा वापर मतदारांना करता येईल. प्राप्त दावे व हरकतींवर २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कार्यवाही केली जाईल आणि अंतिम मतदार यादी ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

जाहीर आवाहन

बीड जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी तसेच १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनी ३० सप्टेंबरपर्यंत नमुना ६ भरून मतदार यादीत आपले नाव नोंदवावे आणि लोकशाहीच्या या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड यांनी केले आहे.

cmyk

# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेत झाला बदल, सरकारने जनावरे खरेदीसाठी घेतला महत्वाचा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

**पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सुधारित नियमांमुळे लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांची खरेदी करण्यापासून प्रकल्प उभारणीपर्यंत अधिक सुलभता मिळणार आहे. विशेषतः जनावरे खरेदी करण्यासाठी असलेली राज्याबाहेरील खरेदीची अट शिथिल करण्यात आली असून, आता राज्यातील मान्यताप्राप्त ब्रीडर फार्ममधूनही जनावरे खरेदी करता येणार आहेत.**



यापूर्वी योजनेअंतर्गत दुधाळ जनावरे केवळ राज्याबाहेरून खरेदी करण्याची अट होती. सुधारित नियमांनुसार आता लाभार्थी महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त ब्रीडर फार्म, राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गत ब्रीड मल्टीप्लिकेशन फार्म्स किंवा इतर राज्यांमधून दुधाळ जनावरांची खरेदी करू शकतील. त्यामुळे चांगल्या दर्जाची जनावरे स्थानिक पातळीवर उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. योजनेच्या लाभार्थी निवड प्रक्रियेतही बदल करण्यात आला आहे. ऑनलाइन प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र लाभार्थ्यांची निवड आता प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. त्यामुळे अर्ज प्रक्रिया पूर्ण करून पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जाच्या क्रमवारीनुसार प्राधान्य मिळणार आहे. योजनेअंतर्गत बँकेकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीबाबतही नियम स्पष्ट करण्यात आले आहेत. बँक कर्जाच्या हप्त्यांची विहित वेळेत परतफेड करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांचीच राहणार आहे. त्यामुळे कर्ज घेतल्यानंतर त्याची नियमित परतफेड करण्याचे आर्थिक नियोजन लाभार्थ्यांना करावे लागणार आहे. या निर्णयामुळे स्थानिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक मान्यताप्राप्त फार्ममधून जनावरे खरेदी करता येणार असल्याने वाहतूक व इतर अडचणी कमी होण्यास मदत होईल.

## तामिळनाडूत दूध खरेदी दरात पुन्हा ३ रुपयांची वाढ ; दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा



**चेन्नई । वृत्तसंस्था**

**तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी सोमवारी दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. दूध खरेदी दरात आणखी ३ रुपये प्रतिलिटर वाढ करण्यात आली असून, त्यामुळे दूध खरेदीचा दर ४१ रुपयांवरून ४४ रुपये प्रतिलिटर झाला आहे. या निर्णयाचा राज्यातील दूध उत्पादक सहकारी संस्थांशी संबंधित सुमारे ३.१५ लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे.**

तामिळनाडू विधानसभेचे दोन दिवसांच्या सुट्टीनंतर कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्री विजय यांनी नियम ११० अंतर्गत ही घोषणा केली. दुभत्या जनावरांच्या संगोपनाचा वाढता खर्च, पशुखाद्याच्या किमतीत झालेली मोठी वाढ आणि इतर आवश्यक निविष्ठांच्या वाढलेल्या दरांमुळे दूध उत्पादकांनी खरेदी दर वाढवण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून सरकारने प्रतिलिटर आणखी ३ रुपये वाढ देण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तर नोव्हेंबर २०२२ पासून ४.३ टक्के फॅट आणि ८.२ टक्के सॉलिड्स-नॉट-फॅट असलेल्या दुधाचा खरेदी दर प्रति लिटर ३५ रुपये होता. त्यावर राज्य सरकारकडून प्रति लिटर ३ रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जात होता. त्यामुळे दूध उत्पादकांना एकूण ३८ रुपये प्रति लिटर मिळत होते. तर त्यामध्ये ३ रुपयाची वाढ करण्यात आली होती. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारने दूध खरेदी दरात ३८ रुपयांवरून ४१ रुपये प्रतिलिटर अशी वाढ केली होती. आता पुन्हा ३ रुपयांची वाढ झाल्याने सहकारी संस्थांच्या माध्यमातून दूध पुरवठा करणाऱ्या उत्पादकांना ४४ रुपये प्रतिलिटर मिळणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या निर्णयाचा उद्देश दूध उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि चारा, पशुवैद्यकीय उपचार, औषधे, मजुरी तसेच वाहतूक खर्चातील वाढीचा सामना करण्यास मदत करणे हा आहे. दूध उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे दूध सहकारी संस्थांना दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच दुभत्या जनावरांचे पालन सुरू ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळून राज्यातील सहकारी दुग्ध व्यवसायासाठी दूधाचा नियमित पुरवठा कायम राहण्यास मदत होऊ शकते.

# आता कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांची गर्भधारणा



**ग्रामीण भागात शेळीपालन हा एक महत्वाचा शेतीपूरक व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील अर्थशास्त्र सुद्धा बऱ्यापैकी या व्यवसायावर अवलंबून आहे. हा व्यवसाय जास्तीत जास्त फायदेशीर कसा करता येईल यासाठी प्रयत्न सुरु असतात. असाच एक शोध म्हणजे कृत्रिम रेतन. आतापर्यंत गायी आणि म्हशींमध्ये कृत्रिम गर्भधारणा याविषयी ऐकले आहे.**

कृत्रिम रेतन एक असे तंत्र आहे ज्याद्वारे पशुपालक त्यांच्या गायी आणि म्हशींचा विकास दर, आरोग्य आणि उत्पादकता वाढवून त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात. परंतु आता शेळ्यांमध्ये सुद्धा कृत्रिम गर्भधारणा करण्याचे प्रयोग केले जात आहे. काही ठिकाणी हे प्रयोग यशस्वी सुद्धा झाले आहेत. कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांच्या जाती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जाणून घेऊ याविषयी माहिती. कृत्रिम रेतन तंत्रज्ञान हे सहाय्यक पुनरुत्पादन तंत्रज्ञान () आहे, ज्याचा उपयोग साठलेले वीर्य थेट प्राण्यांच्या गर्भाशयात जमा करण्यासाठी केला जातो. पशुधनाची कार्यक्षमता आणि अनुवांशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी ही एक उत्तम प्रजनन पद्धत आहे. याचा फायदा शेळीपालक यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. शेळ्यांच्या कृत्रिम रेतनाचा फायदा होईल :एक शेळी सुमारे १४ महिन्यांत ३५ ते ४० किलो वजनाची होते हे. पर्यावरण आणि योग्य आहाराअभावी त्यांचा वाढीचा दर कमी झाला आहे. त्यामुळे आता हा कालावधी वाढून १६ महिन्यांचा झालेला असल्याने पशुपालकांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पशुपालकांनी वैज्ञानिकांच्या या एआय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेळ्यांच्या मुलांच्या शारीरिक विकासात वाढ होऊन उत्पादनही चांगले होईल.

# अर्का निकिता-लागवडीस अनुकूल, संकरित भेंडीची वैशिष्ट्यपूर्ण जात!

**अर्का निकिता -आधारित भेंडीचा पहिला संकरित वाण आहे जो भारत आणि जगातील सार्वजनिक संस्थांनी विकसित केला आहे. ही भेंडीची संकरित जात २०१७ मध्ये संस्थेने शोधून प्रसारित केलेली आहे.लवकर फुलधारणा होणाऱ्या या जातीत फुले येण्यासाठी ३९ दिवस आणि फळे येण्यासाठी ४३ दिवस लागतात. या जातीची फळे गडद हिरवी, मध्यम, गुळगुळीत आणि कोवळी असतात. या जातीत पौष्टिकदृष्ट्या जास्त अँटिऑक्सिडेंट आणि उच्च दर्ज्याचे फायबर (८.८५%) असतात. यात पोटॅशियम ३.७%, कॅल्शियम ९९७ /१०० ग्रॅम सारखे खनिजे आहेत. ही जात १२५-१३० दिवसांच्या कालावधीत तोडणीला तयार होत असून उत्पादन २१-२४ टन मिळते. अर्का निकिता ही भेंडीची जात उच्च उत्पादकता आणि शेतीसाठी अनुकूलता यासाठी ओळखली जाते. पारंपारिक शेती पद्धतींसह आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड याद्वारे या जातीचे लक्षणीय उत्पादन घेता येते. अर्का निकिता ही भेंडीची जात तिच्यातील अपवादात्मक गुणधर्मासाठी ओळखली जाते जसे, उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हंगामात आणि प्रदेशांमध्ये लागवडीस अनुकूलता.**

अर्का निकीता भेंडीची प्रमुख वैशिष्ट्ये : उच्च उत्पादन - अर्का निकिता प्रति हेक्टर २१-२४ टन इतके प्रभावी उत्पादन देते. या उच्च उत्पादकतेमुळे शेतकर्यांसाठी जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी



एक चांगली निवड ठरते. फळांची गुणवत्ता - या संकरीत भेंडीची फळे गडद हिरवी, गुळगुळीत पाच कड्यांची असतात. यामुळे ही भेंडी दिसायला आकर्षक तर आहेच शिवाय काढणीस सोपी आहे. कोवळी फळे यामुळे या जातीला बाजारभाव सुद्धा चांगला मिळतो. अनुकूलता - अर्का निकिता विविध प्रकारच्या परिस्थितीत लागवडीसाठी योग्य आहे. या जातीची खरीप (पावसाळा) आणि रब्बी (हिवाळा) दोन्ही हंगामात लागवड करता येते. ही जात कर्नाटक, आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, हरियाणा, महाराष्ट्र आणि अंदमान आणि निकोबार बेटांसह संपूर्ण भारतातील प्रमुख भेंडी-उत्पादक प्रदेशांसाठी अनुकूल आहे. रोग सहनशील - ही संकरित जात भेंडी पिकातील हानिकारक यलो व्हेन मोझॅक व्हायरस या रोगास सहनशील आहे. त्यामुळे पिकाच्या उत्पादनात वाढ होऊन दर्जा सुद्धा वाढतो.

# जनावरांच्या आहारात 'लोहचा' समावेश! जाणून घ्या महत्व



**शेतकरी शेतीसोबत जोडव्यवसाय म्हणून पशुपालन करतात. या व्यवसायामध्ये चांगले उत्पादन मिळवण्यासाठी तसेच जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शेतकऱ्यांना वेगवेगळ्या गोष्टींची काळजी घ्यावी लागते. यामध्ये एक महत्वाचा घटक म्हणजे आहार. जनावरांच्या आहारात वेगवेगळी जीवनसत्वे वेगवेगळी कार्ये करतात.**

**जनावरांच्या आरोग्यात लोहाचे महत्व :**

जनावरांच्या आहारात लोहाचा वापर असणे गरजेचे असते. महत्त्वाचे म्हणजे जनावरांच्या शरिरातील लोहाची पातळी केवळ शोषणाद्वारे नियंत्रित केली जाते. जनावरांच्या शरिरातील लोह उत्सर्जनाची यंत्रणा ही एक अनियंत्रित प्रक्रिया आहे जी घाम येणे, केस आणि त्वचेच्या पेशी गळणे आणि एन्टरोसाइट्सचे जलद उलाढाल आणि उत्सर्जन या द्वारे होते.

**जनावरांच्या शरीरात लोहाचे महत्व :**

लोह रक्तातील साखरेचे ऊर्जेमध्ये रूपांतर करण्यास मदत करते. लोह जनावरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. निरोगी त्वचा, केस आणि नखांसाठी महत्त्वाचे आहे. लोह हे रक्त निर्मितीसाठी आवश्यक घटक आहे. जनावरांच्या शरीरातील सुमारे ७० टक्के लोह रक्तातील हिमोग्लोबीन नावाच्या लाल रक्तपेशींमध्ये आणि मायोग्लोबिन नावाच्या स्नायूंच्या पेशींमध्ये आढळते. रक्तातील ऑक्सिजन फुफ्फुसातून उतींमध्ये हस्तांतरित करण्यासाठी हिमोग्लोबीन आवश्यक आहे.

**जनावरांमध्ये जाणवणारी लक्षणे :**

लोहाच्या कमतरतेमुळे रवंथ करणाऱ्या जनावरांमध्ये अत्यंत थकवा, अशक्तपणा येतो, त्वचा फिकट होते, छातीत दुखणे, जलद हृदयाचा ठोका होणे किंवा श्वास लागणे इत्यादी लक्षणे उद्भवतात. पाय थंड होणे, जिभेची जळजळ किंवा वेदना होणे, नखे ठिसूळ होणे इत्यादी लक्षणे दिसून येतात. वराह व त्यांच्या पिल्लांना पिगलेट ॲनिमिया आजार होतो.

**आहार व्यवस्थापन :**

जनावराला खाद्यातून नियमित लोह युक्त क्षार मिश्रणे द्या. मोठ्या जनावरांत ५० ते १०० ग्रॅम, तर लहान जनावरांत १५ ग्रॅम ते २० ग्रॅम हे प्रमाण ठेवा.

**जनावराला पालेदार चारा विशेषतः द्विदल चारा त्यांच्या वजनाप्रमाणे द्या.**

आहारात लोह असलेले पदार्थ जास्त खायला द्या. पशुआहारात जीवनसत्त्व 'क' असलेले अधिक अन्न पदार्थ समाविष्ट करा. कारण ते शरीरात लोह शोषण्यास मदत करते.

# 'गुलाबी लसूण'; जाणून घ्या लागवडीविषयी महत्त्वाच्या बाबी!



**अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या गुलाबी लसणाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे या लसणाचे भाव वाढत चालले आहेत.**

हायब्रीड लसणापेक्षा गावरान लसणाला ग्राहक पसंती दर्शवित आहेत, परंतु हे मिळणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांनी या गुलाबी लसणाच्या लागवडीकडे एक अधिक उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून बघणे गरजेचे आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत एका एकरमधून जवळपास तीन क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. शहरी भागासह ग्रामीण भागातील भाजी मंडईमध्ये गुलाबी रंगाचा लसूण पहावयास मिळत नाही. मोठा व चांगल्या प्रतिचा लसूण मिळाला तरी त्याचा भाव ३५० रुपये असतो. हा लसूण काही मोजक्या शेतकऱ्यांकडेच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिक या लसणाला गावरान असे सुद्धा म्हणतात. दरम्यान, आठवडी बाजारपेठेत भाजीपाला नेहमीच मिळतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळ भाज्यांचे भाव कमी जास्त होत असतात; परंतु हायब्रीड ऐवजी गुलाबी रंगाच्या लसणाला नेहमीच मागणी असते.

**हवामान :** या पिकास समशितोष्ण हवामान उपयुक्त असते. मात्र अति उष्ण व अति थंड हवामान या पिकास मानवत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात ७५ सेमीपेक्षा जास्त पाऊस पडत असल्यास पिकाची वाढ चांगली होत नाही. दिवसाचे २५ ते २८ अंश सेल्सिअस व रात्रीचे १० ते १५ अंश सेल्सिअस तापमानात गढ्ढ्यांची चांगली वाढ होते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात केलेली लागवड अधिक उत्पादन देते. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते, परिणामी उत्पादनात घट होते.

**जमीन :** मध्यम खोलीच्या भरपूर सेंद्रिय खते घातलेल्या रेती मिश्रित कसदार तणविरहित जमिनीत पीक चांगल्या प्रकारे घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनी, चिकण मातीच्या जमिनी लागवडीस योग्य नसतात.

**सुधारित जाती :** महाराष्ट्रामध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, भीमा पर्पल या जाती असून या सर्वांचा रंग गुलाबी किंवा जांभळा असतो. गोदावरी वाणाचा स्वाद अगदी तिखट असून राहुरी विद्यापीठाने हे वाण विकसित केले आहे. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे.

**आंतरपीक :** लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिंबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्येसुद्धा लागवड करता येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९०६ : इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ इंटलेक्च्युअल प्रोपर्टी ॲटॉर्नींची स्थापना झाली.
१९११ : पं. भास्करबुवा बखले यांनी पुण्यात भारत गायन समाजाची स्थापना केली.
१९१४ : रशियातील सेंट पीट्सबर्ग शहराचे नाव बदलुन पेट्रोग्राड करण्यात आले.
१९२३ : टोक्यो आणि योकोहामा परिसरात भूकंप १,०५,००० ठार.
१९३९ : जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले. या घटनेमुळे दुसर्या महायुद्धाची सुरुवात झाली.
१९५१ : अर्नेस्ट हेमिंग्वे यांची 'द ओल्ड मॅन ॲन्ड द सी' ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक व पुलित्झर पुरस्कार मिळाले.
१९५६ : भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना झाली.
१९६१ : ची स्थापना (१ सप्टेंबर १९६१) (राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद )
१९६९ : लिबीयात उठाव होऊन हुकूमशहा मुअम्मर गडाफी सतेवर आला.
१९७२ : आइसलँडमधील रिकजेविक येथे अमेरिकेच्या बॉबी फिशरने रशियाच्या बोरिस स्पास्कीला बुद्धीबळात पराभूत केले व जगज्जेता बनला.
१९७९ : पायोनियर- ११ अंतराळयान शनीपासून २१,००० किमी अंतरावरुन गेले.
१९८५ : संयुक्त अमेरिकन-फ्रेंच मोहिमेमुळे बुडालेले आरएमएस टायटॅनिक सापडले.
१९९१ : उझबेकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९५ : न्यूयॉर्क हेरॉल्ड चे संस्थापक जेम्स गॉर्डन बेनेट सीनियर यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १८७२)
१८१८ : कोस्टा रिका देशाचे पहिले राष्ट्रपती जोस मारिया कॅस्ट्रो माद्रीझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १८९२)
१८९५ : मानव-सक्षम विमानांचे निर्मिते एंगलबर्ट जशचा यांचा जन्म. (मृत्यू: २६ जून १९५५)
१८९६ : अभय चरणारविंद भक्तिवेदांत तथा स्वामी प्रभूपाद हरेकृष्ण पंथाचे संस्थापक (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९७७)
१९०८ : कृष्ण नारायण तथा के. एन. सिंग हिन्दी चित्रपटांतील गाजलेले खलनायक (मृत्यू: ३१ जानेवारी २०००)
१९१५ : राजिंदरसिंग बेदी ऊर्दू कथाकार आणि हिन्दी पटकथालेखक. साहित्य अकादमी पुरस्कार (१९६५), पद्मश्री (१९७२). 'दस्तक' या चित्रपटाची कथा, पटकथा, लेखन व दिग्दर्शन त्यांचे असून या चित्रपटाला तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ? ? १९८४)
१९२१ : माधव मंत्री यष्टीरक्षक व उजव्या हाताचे फलंदाज
१९३० : भारतीय आर्किटेक्ट चार्ल्स कोरिया यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून २०१५)
१९३१ : भारतीय शास्त्रज्ञ आणि विद्वान अब्दुल हक अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑक्टोबर २०१२)
१९४६ : दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष रोह मू-ह्युन यांचा जन्म.
१९४७ : साली भारतीय राजकारणी व लोकसभेचे माजी अध्यक्ष तसचं, मेघालय राज्याचे माजी मुख्यमंत्री पी. एम. संगमा यांचा जन्मदिन.
१९७० : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री आणि लेखक पद्मा लक्ष्मी यांचा जन्म.
१९७६ : जेष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर स्मृतिदिन

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७४ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू (जन्म: ५ मे १४७९)
१५८१ : गुरू राम दास शिखांचे चौथे गुरू (जन्म: २४ सप्टेंबर १५३४)
१७१५ : सलग ७२ वर्षे राज्यकारभार केल्यानंतर फ्रान्सचा राजा १४ वा लुई मरण पावला. त्याचा राज्यकाल कोणत्याही युरोपीय राज्यकर्त्यापेक्षा जास्त होता. (जन्म: ५ सप्टेंबर १६३८)
१८९३ : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (जन्म: ३० ऑगस्ट १८५०)
२००८ : थॉमस जे. बाटा बाटा शू कंपनीचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९१४)
२०१४ : स्पॅनडेक्स चे निर्माते योसेफ शेव्हर्स यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९३०)
२०२० : जेर्झी स्काझाकिएल पोलिश स्पीडवे रायडर, विश्वविजेते (जन्म: २८ जानेवारी १९४९)
२०२० : शेखर गवळी भारतीय क्रिकेटपटू,(महाराष्ट्र) (जन्म: ६ ऑगस्ट १९७५)

# कपाशीवरील 'आकस्मिक मर' रोगाचे व्यवस्थापन!

**बऱ्याच ठिकाणी कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवरच सुकू लागलेली आहेत, यालाच 'आकस्मिक मर' रोग असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर रोगामध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासात आकस्मिक मर रोगाची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते.**

असे करा नियंत्रण :जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करावा. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया + १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाय योजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्या जेणेकरून पुढे होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल.



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६ | ५



# शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या तिर्रट जुगार अड्ड्यावर छापा

## १३ जणांवर कारवाई, लातूर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई, ४४,०८० रोख रक्कम व १० दुचाकींसह एकूण ०८ लाख ६४ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त

लातूर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत लातूर शहरातील महाराणा प्रताप नगर परिसरातील शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या तिर्रट जुगार अड्ड्यावर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत १३ जणांना जुगार खेळताना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, ४४,०८० रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व १० दुचाकी वाहने असा एकूण ८,६४,०८० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील महाराणा प्रताप नगर येथील माधव चोथवे यांच्या शेतात तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असल्याची माहिती मिळाल्याने रात्री सुमारे २०.३० वाजता सदर ठिकाणी छापा टाकला. छाप्यादरम्यान पत्र्याच्या शेडमध्ये दोन वर्तुळांमध्ये एकूण १३ इसम गोलाकार बसून पत्त्यांच्या सहाय्याने तिर्रट जुगार खेळताना मिळून आले. त्यांची अंगझडती घेण्यात आली असता त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य मिळून आले. तसेच दोन्ही वर्तुळांच्या मध्यभागी जुगारासाठी वापरण्यात येणारे पत्त्यांचे गड्डे, रोख रक्कम व चटई आदी साहित्य मिळून आले.

यावेळी रणवीर महादेव चोथवे, वय ४३ वर्षे, रा. चोथवे गल्ली, लातूर, जि. लातूर, महेश बाबासाहेब साळुंके, वय ४३ वर्षे, रा. जुना





औसा रोड, देशपांडे कॉलनी, लातूर, जि. लातूर, नितीन गंगाधर गायकवाड, वय ३६ वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर, जि. लातूर, इम्रान अलीम शेख, वय ४९ वर्षे, रा. मिस्कीनपुरा, खडक हनुमान, लातूर, जि. लातूर,लसचिन सुभाष शिंदे, वय ४८ वर्षे, रा. दयाराम रोड, लातूर, जि. लातूर, लहु हिरा सुळ, वय ६० वर्षे, रा. केशव नगर, लातूर, जि. लातूर, सत्तार अब्दुल गणी शेख, वय ४८ वर्षे, रा. मळवटी रोड, लातूर, जि. लातूर, दशरथ प्रभु देवकत्ते, वय ५५ वर्षे, रा. सुळ गल्ली, लातूर, जि. लातूर, शशिकांत राजाभाऊ चोथवे, वय ३७ वर्षे, रा. चोथवे गल्ली, लातूर, जि. लातूर, दत्ता गोविंद गुबाले, वय ३५ वर्षे, रा. लातूर, बालाजी दत्तात्रय दुडे, वय ३७ वर्षे, रा. कोळगाव, ता. रेणापूर, जि. लातूर, खंडेराव नागेश जाधव, वय ४५ वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर, जि. लातूर, संजीव गुंडेराव जाधव, वय ४२ वर्षे, रा. शिरूर वांजरवाडा, ता. निलंगा, जि. लातूर या आरोपीवर कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये आरोपींकडून व जुगाराच्या ठिकाणाहून एकूण ४४,०८० रोख रक्कम, पत्त्यांचे गड्डे व जुगारासाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले.तसेच जुगाराच्या ठिकाणी आलेली खालील १० दुचाकी वाहने, अंदाजे एकूण किंमत ८,२०,०००, जप्त करण्यात आली आहेत. अशाप्रकारे रोख रक्कम व जुगाराचे साहित्य ४४,०८० तसेच १० दुचाकी वाहने ८,२०,००० असा एकूण ८,६४,०८० किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमातील कलम १२(अ) अन्वये पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.


सदर कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशांवर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर, स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या नेतृत्वातील पथका मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलिस अंमलदार रसुल हामिद पठाण, संजय कांबळे, साहेबराव हाके, अर्जुन राजपुत, विनोद चलवाड, प्रशांत स्वामी, प्रवीण कोळसुरे, पाराजी पुट्टेवाड, प्रेमदास राठोड, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, गोविंद यलमटटे, चंद्रकांत केंद्रे, यांनी केली आहे.

### सभापती ए. जे. बोराडे यांच्या प्रयत्नांना यश

# मंठ्याच्या विकसित नवीन बाजार संकुलाचा मार्ग मोकळा

मंठा । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन बाजार संकुलाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला असून मौजे ठेंगेवडगाव येथील ३ हेक्टर ९५ आर शासकीय गायरान जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती, मंठा यांना देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून सभापती ए. जे. बोराडे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.



या निर्णयाबद्दल सभापती श्री बोराडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्राताई पवार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित जमीन बाजार समितीला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. जिल्हाधिकारी, जालना यांनीही जमीन प्रदान करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार महसूल व वन विभागाने ही जमीन बाजार समितीला देण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे नवीन बाजार समिती संकुल विकसित होण्यास मदत होणार असून व्यापाऱ्यांना व्यापार करण्यासाठी या संकुलाचा उपयोग होणार असल्याचे सभापती श्री बोराडे यांनी सांगितले. मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी नवीन बाजार संकुल उभारण्याची आवश्यकता लक्षात घेऊन शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शेतकरी आणि कृषी व्यापाराशी संबंधित पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे हा शासनाचा सातत्याने प्रयत्न आहे. या निर्णयामुळे मंठा परिसरातील कृषी व्यापाराला आवश्यक असलेल्या आधुनिक सुविधांच्या विकासाला गती मिळेल. असा विश्वास सभापती ए जे बोराडे यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूर जिल्हा कार्यकारणी बैठक व नूतन पदाधिकारी यांचा नियुक्ती कार्यक्रम

लातूर । प्रतिनिधी

दि.२९ शनिवार रोजी संवाद भाजपा कार्यालय अंबेजोगाई रोड येथे राज्य कार्याध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष मच्छिंद्र गुरमे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शक आ.रमेश अप्पा कराड भाजपा प्रदेश उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील चाकूरकर,लातूर महानगरपालिका विरोधी पक्षनेते देविदास काळे, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन तथा जिल्हा उपाध्यक्ष गोपाळ पडिले आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन केले .या कार्यक्रमात लातूर जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष शोभा माने तर कार्यवाह स्मिता मामीलवाड,लातूर महानगरपालिका अध्यक्ष दिगंबर काळे तर कार्यवाह पदी अमोल





इंद्राळे, महिला अध्यक्ष सुनिता पोटे व कार्यवाह पदी विजया दौंड, लातूर महानगर अध्यक्ष अरुणा कांदे तर कार्यवाह गणेश मरेवाड, लातूर तालुका अध्यक्ष विलास जाधव, कार्यवाह संजय सुगावकर तर महिला आघाडी अध्यक्ष लता अनवले, रेणापूर तालुका अध्यक्ष नवनाथ वंगाटे तर कार्यवाह सायना तोटावाड आदी कार्यकारिणी पदाधिकारी यांच्या निवडीचे पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते॰

या कार्यक्रमास सुरेखा बस्तापुरे, राजकन्या गंभीरे, संगिता पाचंगे,रिनाज पठाण, उषा जाधव, शोभा पाटील, उषा रेड्डी, शितल नादरगे, प्रतिभा कदम,समिना शेख, अंगद चामवाड,संदिपान माने,विवेक डोंगरे, हनुमंत गायकवाड, प्रदीप सातपुते, प्रकाश बंडापल्ले, वैभव बोंदर,सलिम आळंद, अरविंद वाडकर, सुर्यकांत वाले, रामभाऊ सगरे, सुरेश वंगवाड,माधव मटवाड, बालाजी भोळे, प्रविण माने, पांडुरंग पवार, पवनकुमार खोत, किशोर चव्हाण,देवराज लंगोटे, महेश तोडकर, शोएब शेख, संजय पुळकुटे, धोंडिराम भिंगोले, शंकर धायगुडे, मारुती खरटमोल, गुरुनाथ चप्पे आदी पदाधिकारी उपस्थित होते.आभार अंगद चामवाड तर उत्कृष्ट संचलन शोभा माने यांनी केले.

# दुष्काळाने कंबर मोडली; शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्या

## पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात आणि विशेषतः बीड तालुक्यात पावसाच्या अनियमिततेमुळे कोरड्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून अनेक भागांत शेतकऱ्यांच्या हातची पिके करपण्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर यांनी केली आहे.



यंदाच्या हंगामात पेरणीसाठी आवश्यक पाऊस वेळेवर न झाल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. बियाणे, खत, मशागत आणि पेरणीसाठी झालेला अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या माथी पडला. त्यानंतर पावसाने पुन्हा दडी मारल्याने उगवलेली पिकेही संकटात सापडली आहेत. काही भागांत पिकांची वाढ खुंटली असून पिके करपण्यास सुरुवात झाली आहे.

दुबार पेरणीमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक शेतकऱ्यांनी उधारीवर बियाणे, खते आणि अन्य शेतीसाहित्य घेतले आहे. मात्र, पिकांपासून अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शक्यता कमी झाल्याने कर्जाचा भार वाढत चालला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडला असून ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पावसाचा खंड आणखी वाढल्यास पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ कागदोपत्री आढावा न घेता प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे डावकर यांनी म्हटले आहे.

शासनाने बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तातडीने दखल घेऊन गावनिहाय पंचनामे करावेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, तसेच पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि आवश्यक त्या दुष्काळी उपाययोजना सुरू कराव्यात, अशी मागणी किरण डावकर यांनी केली आहे.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. त्यामुळे शासनाने विलंब न करता शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठोस पावले उचलावीत, असेही डावकर यांनी स्पष्ट केले.

# दुय्यम निबंधक कार्यालयातील आर्थिक लूट थांबविण्याची मागणी



जामखेड । प्रतिनिधी

जामखेड येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांकडून अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारींची चौकशी करून हा प्रकार थांबवावा, अशी मागणी ह.भ.प. ॲड. महारुद्र महाराज नागरगोजे यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दुय्यम निबंधक कार्यालयात विविध दस्तांच्या नोंदणीसाठी ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने येतात. मात्र, दस्त नोंदणीसाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कार्यालयातील कामकाज पारदर्शक होण्यासाठी कार्यालय परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच या ठिकाणी कोणत्याही प्रकारची लाच घेतली जात नाही' असा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच कार्यालयात कोणकोणते दस्त नोंदविले जातात, त्यासाठी लागणारे शासकीय शुल्क व इतर अधिकृत दरांची माहिती दर्शविणारा फलक नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावण्यात यावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अधिकृत शुल्काची माहिती उपलब्ध झाल्यास नागरिकांना योग्य माहिती मिळेल आणि अतिरिक्त रकमेच्या मागणीला आळा बसेल, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी मनसेचे अध्यक्ष प्रदीप टापरे यांनीही दुय्यम निबंधक कार्यालयाबाबत नागरिकांच्या तक्रारी असल्याचे सांगितले. जामखेड शहरातील खरेदी-विक्रीचे व्यवहार जामखेडऐवजी कर्जत किंवा अहिल्यानगर येथे करण्याची वेळ नागरिकांवर का येत आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शासकीय कार्यालयातील नागरिकांची कामे शासनाच्या नियमांनुसार आणि पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित आहे. त्यामुळे या तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी. दोषी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच जामखेडपासून या उपाययोजनांची सुरुवात करून त्या राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये राबवाव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनातील मागण्यांवर एका महिन्याच्या आत कार्यवाही न झाल्यास जामखेड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा ॲड. महारुद्र महाराज नागरगोजे यांनी दिला आहे.

यावेळी सितारामदादा राळेभात, संतोष राळेभात पाटील, मुरलीधर काळे महाराज, मनसेचे अध्यक्ष प्रदीप टापरे, अशोक पोटफोडे, लक्ष्मण बांगर, धर्माधिकारी मेजर नारायण वाघ, उर्मिला नागरगोजे आडाले, बापू भोरे, प्रल्हाद गीते, बाळू काकडे आदी उपस्थित होते.

# कंबरेला चाकू लावून फिरणाऱ्या तरुणास अटक

उदगीर । प्रतिनिधी

सार्वजनिक ठिकाणी कंबरेला धारदार चाकू लावून फिरणाऱ्या २० वर्षीय तरुणास उदगीर ग्रामीण पोलिसांनी कारवाई करून अटक केली असून, त्याच्याकडून धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे.

दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे २०.३० वाजता डोंग्रज गावातील मारोती मंदिरासमोर एक तरुण कंबरेला चाकू लावून फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तपासणी केली असता रोहित बबन आदावले (वय २० वर्षे, रा. आटोळा, ता. चाकूर, जि. लातूर हा तरुण चाकूसह मिळून आला.पोलिसांनी त्याच्याकडून लोखंडी मुठ असलेला व लाकडी कव्हर असलेला चाकू जप्त केला.

या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे गुरनं. ६०६/२०२६, कलम ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.सदर कारवाई पोलीस निरीक्षक डी. डी. गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# अनैतिक व्यवसायाचा पर्दाफाश; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

लातूर । प्रतिनिधी

शहरातील राजे शिवाजी नगर परिसरात घरामध्ये सुरू असलेल्या कथित अनैतिक व्यवसायावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, लातूर व एमआयडीसी पोलीस ठाणे यांच्या पथकाने कारवाई केली. या कारवाईत दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनास्थळावरून रोख रक्कम, निरोधाचे पाऊच तसेच मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सुमारे १५.०० वाजता राजे शिवाजी नगर, बार्शी रोड, लातूर येथील एका घरात महिलांना पैशांचे आमिष दाखवून आणून पुरुष ग्राहकांना बोलावून अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी प्रशांत गंगाधर बंडे (वय २९, रा. भातांगळी, ता. जि. लातूर, सध्या राजे शिवाजी नगर, बार्शी रोड, लातूर), भारत ज्ञानोबा भोसले (रा. रायवाडी, ता. जि. लातूर) यांच्याविरुद्ध फिर्यादी अजिनाथ भिमराव पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर. यांचे फिर्यादवरून एमआयडीसी पोलीस ठाणे गुरनं. ६०९/२०२६, कलम १४३, ३(५) भारतीय न्याय संहिता तसेच कलम ३, ४ व ५ अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम, १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम १,५०० रुपये, निरोधाचे दोन पाऊच तसेच आरोपी प्रशांत बंडे याच्या ताब्यातील मोबाईल फोन असा एकूण ६,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. कारवाईदरम्यान संबंधित पीडित महिलांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याबाबत आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

सदर कारवाईनंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात रात्री २१.१३ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक समाधान चवरे पुढील तपास करीत आहेत. लातूर शहरातील अनैतिक मानवी व्यापार व महिलांचे शोषण करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत असून, अशा प्रकारची माहिती नागरिकांना निदर्शनास आल्यास त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# टोकवाडीत पाच वर्षांत एकही ग्रामसभा नाही ? गटविकास अधिकारी व ग्रामसेवक आंधळे झाले का ?

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील मौजे टोकवाडी येथे मागील पाच वर्षांत एकही ग्रामसभा घेण्यात आली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी गटविकास





अधिकारी व ग्रामसेवक विस्ताराधिकारी यांना लाज कसे वाटत नाही. ग्रामसभा झाली कशी नाही. याप्रकरणी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णा कांत येणे या प्रकरणी लक्ष देऊन कारवाई करावे. ग्रामसभा न झाल्यामुळे गावातील विकासकामे, शासकीय योजनांचे लाभ, आर्थिक अंदाजपत्रक तसेच विविध लाभार्थ्यांची निवड ग्रामस्थांना विश्वासात न घेता केली जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

याबाबत टोकवाडी येथील ग्रामस्थांनी सोमवारी (ता. ३१) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले. ग्रामसभा हे गावकऱ्यांना आपल्या समस्या मांडण्याचे आणि विकासकामांसह शासकीय योजनांवर चर्चा करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ असताना, पाच वर्षांपासून सभा न झाल्याने नागरिकांच्या हक्कांची गळचेपी होत असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

ग्रामसभेचे नियमित आयोजन न करणाऱ्या संबंधितांची चौकशी करून तातडीने कायदेशीर ग्रामसभा घेण्यात यावी तसेच दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामसभा घेण्याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास पुढील काळात आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे. या निवेदनावर संदीप जाधव, रामेश्वर जाधव, विशाल गोंडगे, सुनील चव्हाण, निशांत जाधव, लखन चव्हाण, अमोल जाधव, आकाश जाधव, तुषार जाधव यांच्यासह शेकडो ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

मा. वसंत एस. यादव साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः १३८९/२०२६

मार्फत. ॲड.जी.एस. कुलकर्णी

दुर्गा भंडारे व इतर विरुद्ध - निरंक

अर्जदार

१) दुर्गा भ्र. मधुकरराव भंडारे वय - ५४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. जेसवानी वाडा, करीमपुरा, बीड ता.जि.बीड २) पुजा पि. मधुकरराव भंडारे वय- ३३ वर्षे, धंदा-घरकाम रा. शुक्रवार पेठ, मस्जीद जवळ, बीड ता.जि.बीड ३) लक्ष्मीकांत पि. मधुकरराव भंडारे वय- २७ वर्षे, धंदा-मजुरी रा. करीमपुरा, माऊलीचौक पेठ बीड ता. जि.बीड ४) रोहित पि. मधुकरराव भंडारे वय २५ वर्षे, धंदा-मजुरी रा. शुक्रवार पेठ, मस्जीद जवळ, बीड ता.जि. बीड

ज्याअर्थी मयत नामे मधुकर पि. दत्तात्रय भंडारे रा. जेसवानी वाडा, करीमपुरा, बीड ता.जि.बीड हे दि.१९.०६.२०२६ रोजी मौजे विस्डम हॉस्पीटल, बाणेर, पुणे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र१. ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र.४ मयताची मुलगी तर अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुले आहेत, मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सहर मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे थात त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे मधुकर पि. दत्तात्रय भंडारे रा जेसवानी वाडा, करीमपुरा, बीड ता.जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२१/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले, पुढील तारीख: ०९/१०/२०२६

**बेंच क्लार्क**

**आदेशावरून**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बीड**

दैनिक
राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६ | ६

# बिंदुसरा अतिक्रमण : रेड झोन मधील फाईलला फुटू लागले पाय

## लढा पर्यावरणाचा वसुंधरेच्या रक्षणाचा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांमधून जाणाऱ्या बिंदुसरा नदीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले या अतिक्रमणाला अधिकृत करण्याचे काम बीड नगरपालिका भूमि अभिलेख कार्यालय ठाणे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून आतापर्यंत करण्यात आले आहे प्रामुख्याने मोठी वाटणारी ही बिंदुसरा नदी हातात केवळ नाला कोण बनली आहे ती भूमाफियांच्या कृपा आशीर्वादामुळे मात्र आता या प्रकरणात नेमकं काय हे ज्या फाइल्स मध्ये घडलं आहे त्याच फाईल्स ला आता पाय फुटू लागले आहेत.

बीड शहर आणि परिसरामध्ये अनेक नदी नाले ओढे यावर मोठ्या प्रमाणात भूमाफी आणि कब्जा केला आहे स्वतःची खिसे भरण्यासाठी यावर अतिक्रमण करत प्लॉट्स विकले गेले मोठमोठ्या इमारती उभा केल्या गेल्या मागील काळामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती त्यावेळी बिंदुसरेला महापूर आला होता या महापुरामध्ये अनेकांचे बळी गेले होते त्यावेळी बिंदुसरा रुंद होती मात्र आता असा काही एखादा मोठा पाऊस झाला अतिवृष्टी सारखी परिस्थिती निर्माण झाली आणि पूर आला तर मोठ्या प्रमाणात जीवित हानी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही आणि हा सर्व प्रकार पाहता जिल्हा प्रशासनाने नदी पात्राशेजारील रेड झोनवरील अतिक्रमणे हटवणे गरजेचे असते मात्र जिल्हा प्रशासनच मूग गिळून गप्प आहे बिंदुसरा नदी अगदी आता नाला वाटू लागला आहे बिंदुसरा नदीच्या दोन्ही बाजूने बार्शी नाका ते इस्कॉन मंदिराच्या पुढे या सर्व भागांमध्ये भूमाफियांनी कब्जा केल्याचे दिसत आहे राज्याचे पर्यावरण विभाग पर्यावरण समृद्धी आणि वसुंधरा वाचवण्यासाठी मोठे मोठे कार्यक्रम हाती घेत आहेत मात्र बीड शहरांमधील या बिंदुसरा नदीला वाचवण्यासाठी कोणीही पुढे येत नसल्याचे दिसत आहेत प्रामुख्याने आताही बिंदुसरा नदी नाव नामशेष होण्याच्या मार्गावर सध्याच्या परिस्थितीत दिसत आहे बार्शी नाका ते मुंड्याकडे जाणारा पूल याच भागामध्ये पाहिले गेले तर दोन्ही बाजूने टोलेजंग इमारती बांधल्या गेले आहेत या इमारती बांधताना कोणतेही नियम पाळले केले नाहीत हा एरिया रेड झोन मध्ये येतो मात्र भूमाके यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तेथील परवानग्या घेतल्या गेल्या परवानगी घेताना वरिष्ठांचे मार्गदर्शन घेतले गेले नाही त्यामुळे आता बिंदुसरा नदीच नामशेष होण्याच्या मार्गावर दिसत आहे या संदर्भात काही सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा अर्ज निवेदने दिली मात्र त्याचा उपयोग झाला नाही अर्ज दिला की अधिकारी मंडळी व माफी यांची संगत करतात आणि हा प्रश्न तिथेच निघालेला होता अशीच परिस्थिती राहिली तर दीड शहरात भूमात यांच्या कब्जात येईल ही परिस्थिती सध्या तरी निर्माण झाली आहे तेव्हा जिल्हा प्रशासनाने बिंदुसरा नदी लगत असलेल्या ज्या काही बांधकाम परवानगी दिलेली आहेत अशा फाईल्स एकदा नजरे काढून काढणे गरजेचे आहे परंतु आता माध्यमाने यावर आवाज उठवल्यानंतर याच फाइल्स ला पाय फुटूलागले आहेत कारण इथे पक्के बांधकाम झाल्याने त्या ठिकाणी अतिक्रमण झाले नाही असे अनेक जण छाती ठोकपणे सांगतात शिवाय आम्ही संबंधितांकडून विकत घेतले आहे असेही सांगतात मग तो विकणारा कोण त्याला परवानगी देणारा कोण याचीही जिल्हाधिकारी यांनी चौकशी केली पाहिजे शासनाने केवळ कागदावर वसुंधरा वाचवा पर्यावरण वाचवा या घोषणा कागदावर न ठेवता प्रत्यक्षात पुढे आणल्या पाहिजे तरच शासनाचा उपक्रम यशस्वी होईल.

### रेड झोनमधील बांधकामाला आशीर्वाद कोणाचे

बिंदुसरा नदी असो करपरा नदी असो या दोन्हीही नद्यांचे पात्र भूमात यांनी अगदी छोटे केले आहे परंतु या दोन्ही नदीच्या काठाला मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग आणि घराची बांधकाम झालेले आहेत भूमाफियांनी या नद्यावर अतिक्रमण केले विशेषतः हा भाग रेड झोन मध्ये येत असतानाही अशा बांधकामांना परवानगी दिली गेली कशी हा मोठा गंभीर प्रश्न आहे







आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस यांचे सुपुत्र सागर धस यांनी सकाळी रामेश्वर मंदिर सौताडा येथे येऊन महापूजा केली यावेळी प्रदीप काका जाधव विकास राळेभात प्रथम नगराध्यक्ष जामखेड किरण शिंदे पाटील पुजारी राम व कुमार गुरुजी पूजा यांनी रामेश्वराला अभिषेक केला.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा वाळूमाफियांना दणका बीड जिल्ह्यातील ४ वाळूमाफियांवर 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि तस्करी करणाऱ्या वाळूमाफियांविरोधात जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने कडक पाऊल उचलले आहे. सलग गुन्हे दाखल असणाऱ्या जिल्ह्यातील चार सराईत वाळूमाफियांवर 'एमपीडीए' (चझऊ- – महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा कायदा) अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली असून त्यांची हर्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे रवानगी करण्यात आली आहे. या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

### अवैध धंदेवाईक व गुन्हेगारांवर 'मोक्का' व 'एमपीडीए' लावणार : पोलीस अधीक्षक नवनीत काँवत

जिल्ह्यात वाळूचा चोरटा व्यापार, अवैध गुटखा विक्री, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक, खंडणीबहाद्दर, धोकादायक गुंड, बेकायदेशीर जुगार, लॉटरी आणि हातभट्टी दारूचा व्यवसाय चालवणाऱ्यांवर यापुढेही जास्तीत जास्त एमपीडीए (MPD-) व मोक्का (MCOCA) कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल.

– श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, बीड

हनुमंत रामभाऊ काशिद (वय ५०, रा. फुलसांगवी, ता. शिरूर कासार) : शिरूर कासार पोलीस ठाण्यामार्फत दाखल प्रस्तावास जिल्हादंडाधिकाऱ्यांनी १६ मार्च २०२६ रोजी मंजुरी दिली असून, त्यास हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. अक्षय महादेव इंगळे (वय २८, रा. बागपिंपळगाव, ता. गेवराई) : चकलंबा पोलीस ठाण्याने दाखल केलेल्या प्रस्तावास २३ जुलै २०२६ रोजी मंजुरी मिळून, त्यास ३० जुलै रोजी हर्सूल कारागृहात पाठवण्यात आले आहे. गोविंद चंद्रहास गोबरे (वय ३०, रा. टाकरवण, ता. माजलगाव) : तलवाडा पोलीस ठाण्याच्या प्रस्तावास ११ ऑगस्ट २०२६ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेने त्यास ताब्यात घेऊन १२ ऑगस्ट रोजी हर्सूल कारागृहात हजर केले.तुकाराम कचरूबा आव्हाड (वय ३९, रा. नित्रूड, ता. माजलगाव) : माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यामार्फत दाखल प्रस्तावास ११ ऑगस्ट २०२६ रोजी मंजुरी मिळून, स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतल्यानंतर १२ ऑगस्ट रोजी त्याची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली.

आणखी वाळूमाफिया रडारवर

जिल्ह्यातील इतर दोन वाळूमाफियांचे एमपीडीए प्रस्ताव सध्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. याशिवाय, जिल्ह्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांची सखोल तपासणी करून इतर वाळूमाफियांची स्वतंत्र यादी तयार करण्यात येत असून, पान ३ वर

# माजलगाव नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभाराविरोधात नवीद सिद्दिकी आक्रमक; कचरा थेट मुख्याधिकाऱ्यांच्या दारात टाकण्याचा इशारा!

माजलगाव । प्रतिनिधी

नगरपरिषदेचा निष्काळजी आणि हलगर्जी कारभार आता माजलगावचे नागरिक अजिबात सहन करणार नाहीत, असा संतप्त इशारा समाजवादी पार्टीचे माजी तालुकाध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटनेचे तालुकाध्यक्ष नवीद सिद्दिकी यांनी दिला आहे. शहरातील वाढती घाण आणि साथीचे आजार पाहता, नगरपरिषदेने तात्काळ संपूर्ण शहराची साफसफाई करून मलेरिया प्रतिबंधक औषधांची फवारणी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असे त्यांनी



प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

शहरात सध्या ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून डासांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नगरपरिषदेचे कर्मचारी केवळ 'थातूरमातूर' साफसफाई करून प्रशासनाची आणि नागरिकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप सिद्दिकी यांनी केला आहे.

नवीद सिद्दिकी यांनी प्रशासनाला दिलेल्या मुख्य मागण्या आणि इशारा:

तात्काळ संपूण पान ३ वर

# चौसाळ्यात पावसाळ्यापूर्वीच पेव्हर ब्लॉकचे काम खचले

बीड । प्रतिनिधी

चौसाळा येथे रस्त्याच्या कडेला पाव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुरू असून, कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा बीड शहर अध्यक्ष अशोक लोढा यांनी केला आहे. पाव्हर ब्लॉकच्या खाली योग्य पायाभूत थर व काँक्रीट न केल्यामुळे काही ठिकाणी ब्लॉक खचल्याचे त्यांनी म्हटले आहे.

चौसाळा येथे रस्त्याच्या कडेला पाव्हर ब्लॉक बसविण्याचे काम दोन ते तीन वर्षांपूर्वी मंजूर झाले होते. संबंधित कंत्राटदाराकडून सध्या हे काम करण्यात येत आहे. मात्र, पाव्हर ब्लॉकच्या खाली कच्ची माती असून त्यावर योग्य प्रकारे काँक्रीट अथवा पक्का बेस तयार करण्यात आलेला नसल्याने ब्लॉक काही ठिकाणी खाली खचले आहेत. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काम सुरू असताना संबंधित खात्याचा अधिकारी प्रत्यक्ष साइटवर येऊन पाहणी करत नसल्याचा आरोप अशोक लोढा यांनी केला. अधिकाऱ्यांच्या देखरेखीअभावी कामाचा दर्जा घसरत असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पान ३ वर



# गणेश मंडळांना आता ऑनलाइन पोलीस परवानगी

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा पोलीस दलाची सुविधा; पोलीस ठाण्यात गर्दी न करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

आगामी श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांची गैरसोय टाळण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलाने ऑनलाइन पोलीस परवानगीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळांनी पोलीस ठाण्यात गर्दी न करता या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक बीड समीर शेख व अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके यांनी केले आहे.

ऑनलाइन अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नागरिक सेवा संकेतस्थळावर जाऊन 'ऑनलाइन सर्व्हिसेस'मधील 'गणेश फेस्टिव्हल परमिशन प्लिकेशन हा पर्याय निवडावा. त्यानंतर अर्जात आवश्यक माहिती भरून तो ऑनलाइन सादर करावा.

अर्ज सादर झाल्यानंतर संबंधित पोलीस ठाण्याचे अंमलदार गणेश मंडळाला प्रत्यक्ष भेट देऊन आवश्यक बाबींची पूर्तता करून घेतील. त्यानंतर ऑनलाइन प्रणालीद्वारेच मंडळाला पोलीस परवाना देण्यात येणार आहे. अर्ज भरण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन बीड जिल्हा पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच अधिकृत फेसबुक पेजवर माहितीपूर्ण सादरीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहे. अर्ज भरताना अडचण आल्यास मंडळांनी स्थानिक पोलीस ठाण्यातील जि.वि.शा. अंमलदाराशी संपर्क साधावा. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील पो.ह. निलेश (९९२१३३७१३८) किंवा पो.अं. चंद्रसेन (७५०७७८८५०१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गणेश मंडळांनी वेळेत ऑनलाइन अर्ज करून परवानगीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# भाजपच्या बीड जिल्हा सचिवपदी माऊली पानसंबळ यांची निवड

शिरूर कासार । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चाच्या बीड जिल्हा सचिव पदी माऊली आबा पानसंबळ यांची निवड करण्यात आली.

राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे विश्वासू खंदे समर्थक पक्षाचे प्रामाणिक पणे काम करणारे माऊली पानसंबळ यांची युवा मोर्चाच्या बीड जिल्हा सचिवपदी निवड झाल्याबद्दल सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मा. खा. प्रीतम मुंडे, तसेच भाजपयुमोचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक,जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या सूचनेनुसार व युवक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी ही निवड जाहीर केली असून या निवडीबद्दल माऊली आबा पानसंबळ यांचे सर्व स्तरातून जिल्हाभरातून स्वागत होत आहे.

# स्कार्पिओसाठी १० लाखांची मागणी २२ वर्षीय विवाहितेची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

अपत्य होत नसल्याचे कारण देत तसेच स्कार्पिओ गाडी खरेदीसाठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची मागणी करत छळ केल्याच्या आरोपातून बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील २२ वर्षीय विवाहितेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांनी पतीसह चौघांविरोधात गुन्हा दाखल केला असून पती सचिन नवनाथ रहाडे याला अटक करण्यात आली आहे.

वाखनाथपूर येथील वशिष्ठ काशिनाथ खाकरे यांची मुलगी वैष्णवी हिचा विवाह दीड वर्षांपूर्वी घोडका राजुरी येथील सचिन नवनाथ रहाडे याच्याशी झाला होता. विवाहानंतर सुरुवातीचा काही काळ संसार सुरळीत सुरू होता. त्यानंतर अपत्य होत नसल्याचे कारण पुढे करून तसेच स्कार्पिओ गाडी घेण्यासाठी माहेरहून १० लाख रुपये आणावेत, यासाठी तिच्यावर दबाव टाकण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

माहेरच्या मंडळींनी नातेवाईकांसह बैठक घेऊन संबंधितांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही वैष्णवीला त्रास दिला जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकाराला पान ३ वर



**घोडका राजुरीतील घटना; पतीला अटक, तिघांचा पोलीस शोध सुरू**

# तिसऱ्या श्रावण सोमवारी शिवालयांत भक्तीचा जागर; भाविकांची दर्शनासाठी गर्दी

### बीडच्या कनकालेश्वरासह परळीच्या वैद्यनाथ मंदिरात भाविकांची मांदियाळी

बीड । प्रतिनिधी

श्रावणातील तिसऱ्या सोमवारनिमित्त बीड शहरातील कनकालेश्वर मंदिर, परळी वैद्यनाथ येथील प्रभू वैद्यनाथ मंदिरासह जिल्ह्यातील विविध महादेव मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ सुरू झाली होती. भाविकांनी महादेवाचे दर्शन घेत अभिषेक, पूजन करून बेलपत्र अर्पण केले.

बीड शहरातील कनकालेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. परळी येथील वैद्यनाथ मंदिरातही बीड जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून भाविक दाखल झाले. श्रावण सोमवारच्या निमित्ताने मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महादेव मंदिरांमध्येही सकाळपासून भाविकांची गर्दी होती. अनेक ठिकाणी मंदिर व्यवस्थापनाकडून दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रमुख मंदिर परिसरात पोलीस प्रशासनाकडून बंदोबस्त ठेवण्यात आला असून, भाविकांची सुरक्षितता आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यावर लक्ष देण्यात आले.



# आष्टीत भेसळखोरांवर पोलिसांचा कडक प्रहार!

### Whey Powder च्या नावाखाली अन्नभेसळीचा काळा धंदा; ७२ गोण्यांसह तब्बल १,८०० किलो माल जप्त

आष्टी । प्रतिनिधी

अन्नपदार्थांमध्ये भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या Whey Powder (Skimmed) ची अवैध वाहतूक व पुरवठा करणाऱ्या टोळीवर आष्टी पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ७२ गोण्या, अंदाजे १,८०० किलो भेसळीचा माल आणि सुमारे २ लाख ६९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अन्नभेसळीच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26